बी.एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बीड | गुरूवार, दि.५ सप्टेंबर २०२४ | वर्षे४रे | अंक३५वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## सीबीआयकडून गुन्हा दाखल होताच पसार!

मुंबई: सीबीआयने माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. राज्याचे गृहमंत्री असताना गिरीश महाजन यांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्यासाठी जळगावच्या तत्कालीन पोलीस अधीक्षकांवर त्यांनी दबाव टाकल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे. हा गुन्हा दाखल झाल्यानंतर अनिल देशमुख यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. सीबीआयने गुन्हा दाखल केल्यानंतर अनिल देशमुख यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. माझ्यावर सीबीआयकडून आणखी एक तथ्यहीन गुन्हा दाखल केला गेला आहे. जनतेचा कौल बघून फडणवीसांच्या पायाखालची वाळू घसरल्याने हे कटकारस्थान सुरू झाले आहे. या अशा धमक्यांना आणि दबावाला मी अजिबात भीक घालत नाही. न झुकता, न डगमगता मी भाजपाच्या दडपशाहीविरुद्ध लढण्याची खूनगाठ बांधली आहे, असं ते म्हणाले.

# गेवराई तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करा!

### मयुरी खेडकर:गेवराई तालुक्यात पिकांचे मोठे नुकसान

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास निसर्गाच्या लहरीपणाने हिरावला आहे. मागील चार पाच दिवसांपासून गेवराई तालुक्यातील सर्व महसूल मंडळात जोरदार पाऊस पडत आहे. यामुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. कापूस, सोयाबीन, भुईमूग, तुर आदी शेतातील खरीप पिके अतिवृष्टीमुळे वाया गेली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी मोठा खर्च करुन जोपासलेली पिकांना बसलेला फटका लक्षात घेता, शासनाने गेवराई तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट भरपाई द्यावी, अशी मागणी मयुरी खेडकर-मस्के यांनी केली आहे.

यावर्षी जुनच्या पहिल्याच आठवड्यात मान्सूनचे आगमन होऊन पावसाची परिस्थिती चांगली राहिली. यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत होऊन त्यांनी कपाशीसह इतर पिकांची लागवड केली. यानंतर देखील सातत्याने चांगला पाऊस झाल्याने पिकांची उगवण चांगली होऊन पिके जोमदार आली. पिके चांगली दिसून आल्याने शेतकऱ्यांनी देखील शेतातील पिकांच्या आंतरमशागतीसह खते, औषधे यावर मोठ्या प्रमाणात खर्च केलेला आहे. दरम्यान पिकांवर जो खर्च व्हायचा तो झालेला आहे, आता शेतकऱ्यांच्या पदरात पडण्याची वेळ असतानाच संपूर्ण गेवराई तालुक्यात मागील चार पाच दिवसांत मोठ्या प्रमाणावर पाऊस पडला आहे. तालुक्यातील सर्वच मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली झाली आहे. सध्या अनेक गावांमधील शेतातील पिकांमधून पाणी वाहत आहे. तालुक्यातील सर्व महसूल मंडळात अतिवृष्टीचा

पान २ वर...

### शेतकरी जगाचा पोशिंदा!

शेतकरी वर्ग जगाचा पोशिंदा आहे.त्यामुळे त्याच्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. म्हणून सरकारने अतिवृष्टी झालेल्या भागात पंचनामे करत बसण्यापेक्षा ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून बाहेर काढावे. कारण सरकारने निवडणुका डोळ्यासमोर ठेवून अनेक योजना सुरू करून त्या योजनांचा पैसा देखील जनतेच्या खात्यात वर्ग केला. त्यामुळे शेतकऱ्यांसंदर्भात सरकारने सढळ हाताने ओला दुष्काळ जाहीर करून खंबीरपणे त्याच्या पाठीमागे उभा राहावे. अशी मागणी मयुरी खेडकर यांनी केली.



## आ.नितेश राणेवर गुन्हा दाखल करा!

### आक्रमक : सकल मुस्लिम समाजाकडून आंदोलन



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

आज परळी येथे सकल मुस्लिम समाजाकडून परळी पोलिस ठाणे येथे नितेश राणेवर गुन्हा दाखल करा या मागणीसाठी दुपारी १२:३० वाजे पासून पोलीस ठाणे समोर ठिय्या आंदोलन करण्यात आले आहे

सविस्तर बातमी अशी आहे की रामगिरी महाराज यांनी अखंड हरिनाम सप्ताह मौजे पचाळे ता. सिन्नर जि. नाशिक याठिकाणी सुरु असलेल्या सप्ताहाचे प्रवचन चालु असतांना उपस्थित असलेल्या सर्व लोकांसमक्ष लाईव्ह प्रक्षेपण असतांना असे सांगीतले की, आज भारतामध्ये एक कोटीपेक्षा मुस्लीमांचा जास्त आकडा आहे की, त्यांनी इस्लाम सोडला आहे. दहा वीस वर्ष जे मौलाना म्हणून जे राहिले आहे. त्या इस्लामचा सुक्ष्म अभ्यास केला त्यावेळी त्यांचे लक्षात आले की, अन्याय अत्याचार शिवाय या मध्ये काही नाही. म्हणून त्यांनी धर्म सोडुन

पान २ वर...

# 'एसटीचा' संप अखेर मागे!

## दिलासा: सरकारकडून पगारात साडे सहा हजारांची वाढ

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

आपल्या विविध मागण्यांसाठी राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) कर्मचाऱ्यांनी दोन दिवसांपासून कामबंद आंदोलन सुरू केलं होतं. त्यामुळे राज्यभरातील एसटी सेवा विस्कळीत झाली होती. दरम्यान, यासंदर्भात आज मुख्यमंत्री आणि एसटी कामगार संघटना यांच्यात बैठक पार पडली. या बैठकीनंतर आता एसटी कर्मचाऱ्यांनी संप मागे घेत असल्याचे जाहीर केलं आहे.आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथी गृहावर झालेल्या बैठकीत राज्य सरकारने एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य केल्या असून त्यांच्या पगारात घसघशीत वाढ करण्यात आली आहे. सरकारने कर्मचाऱ्यांच्या मूळ पगारात साडे सहा हजार रुपयांची वाढ करण्याचे मान्य केलं आहे. तसेच ज्यांना कर्मचाऱ्यांना गुन्हे दाखल झाल्याने बडतर्फ करण्यात आले आहे. त्यांना पुन्हा कामावर घेण्याचंही सरकारने मान्य



केलं आहे. सरकारच्या या निर्णयानंतर एसटी कर्मचारी संघटनांनी समाधान व्यक्त केलं आहे. दरम्यान, सरकारच्या या निर्णयानंतर भाजपा नेते गोपीचंद पडळकर यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करत त्यांना सरसकट साडेसहा हजार रुपयांची पगार वाढ दिली आहे. ज्यांच्या पगारामध्ये २०२१ साली पाच हजार रुपयांची वाढ झाली होती. त्यांच्या मूळ पगारामध्ये दीड हजार रुपयांची वाढ झालेली आहे. ज्यांना चार हजारांची वाढ दिली होती, त्यांच्या पगारामध्ये अडीच हजारांची वाढ झाली आहे. तर ज्यांना अडीच हजारांची वाढ झाली होती, त्यांच्या पगारात चार हजार रुपायांची वाढ झाली आहे, असे ते म्हणाले. दरम्यान, राज्यात दोन दिवसांपासून एसटी कर्मचाऱ्यांचा संप सुरू होता. ऐन गणेशोत्सवाच्या काळात एसटी कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या प्रवाशांचे हाल होते होते. यासंदर्भात मंत्री उदय सामंत यांनी एसटी कर्मचारी कृती समितीबरोबर बैठकही घेतली होती. मात्र, या बैठकीत तोडगा निघू शकला नव्हता. त्यानंतर आज मुख्यमंत्र्यांबरोबर एसटी कर्मचारी कृती समिती आणि विविध संघटनाच्या पदाधिकाऱ्यांची बैठकी पार पडली. या बैठकीत तोडगा निघाल्याने संप मागे घेण्यात आला आहे.

## शेकापने केलेल्या मागण्या रास्तच!

### ॲड.नारायण गोले: अस्मानी संकटात शेतकरी उध्वस्त



माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीचा प्रचंड फटका बसलेला असून शेतकऱ्याचे संपूर्ण पिके अतिवृष्टीमुळे गेले असल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असताना कृषी मंत्री पाहणीचे आणि पंचनाम्याचे नाटक करत आहेत, वास्तविक अतिवृष्टीमुळे शेतकरी शंभर टक्के उध्वस्त झालेला असताना शेतकऱ्यांना लाख रुपये नुकसान भरपाई देऊन १००% पीक विमा लागू करण्याची मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने माजलगाव तहसीलदार यांना निवेदनाद्वारे केली. आणि शंभर इशारा शेकडो कार्यकर्त्यांनी तहसील समोर प्रचंड घोषणाबाजी केली व शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणाचा निषेध केला, शेतकऱ्यांच्या

पान २ वर...

## विश्वशांती बुद्ध विहाराचे लोकार्पण

### कार्यक्रम: राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते लोकार्पण

उदगीर/पुण्यभूमी प्रतिनिधी

उदगीर येथील तळवेस परिसरातील नवनिर्मित विश्वशांती बुद्ध विहाराचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते आज लोकार्पण झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, विशेष अतिथी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले होते. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीष महाजन, क्रीडा मंत्री संजय बनसोडे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, सर्वश्री आमदार

पान २ वर...



### विहाराची वैशिष्ट्ये

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते आज लोकार्पण झालेले उदगीर येथील विहार कर्नाटक येथील कलबुर्गीच्या बुद्ध विहाराची प्रतिकृती आहे. एक हेक्टर १५ आर जागेवर या विहाराची उभारणी करण्यात आली आहे. विहारात १२०० अनुयायांची बैठक व्यवस्था असलेले ध्यान केंद्र तयार करण्यात आले आहे. विहार परिसरात प्रवेश करण्यासाठी एक मुख्य प्रवेशद्वार तयार करण्यात आले आहे. या प्रवेशद्वाराची रचना बिहारमधील सांची स्तूपाप्रमाणे करण्यात आली आहे.

## वृत्तपत्र कर्मचाऱ्यांना कोटींचे विमा कवच

### ऋणानुबंध: डॉ.योगेश क्षीरसागरांच्या उपक्रमाचे कौतुक



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

दि.४ : शहरातील वृत्तपत्र क्षेत्रातील कर्मचारी, वृत्तपत्र विक्रेते अशा एकूण २२० जणांना राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी ११ कोटींचे अपघाती विमा कवच दिले आहे. यासंदर्भात बीड जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्यावतीने विमा वितरणाचा कार्यक्रम घेतला होता. या उपक्रमाचे पत्रकारांकडून कौतुक करण्यात आले.

बीडच्या वृत्तपत्र क्षेत्रामध्ये अनेक वर्षांपासून विविध विभागात कर्मचारी कार्यरत आहेत. मात्र त्यांना कसल्याच प्रकारचे विमा संरक्षण मिळाले नाही. अत्यंत तुटपुंज्या मानधनावर वृत्तपत्र क्षेत्रातील संगणक विभाग, मशीन ऑपरेटर, कामगार, वृत्तपत्र वाटप करणारे मुले, श्रमिक कामगार काम करत असतात. एखाद्या दुर्घटनेत वृत्तपत्र कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला तर

पान २ वर...

### ॲड.अशोक चंदनशिव — बहुजन समाज पार्टीचा निर्धार

# आगामी निवडणुकांसाठी आम्ही रणमैदानात!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

कोणत्याही समाजाच्या उन्नतीसाठी राजकीय सत्ता महत्वाची असते. त्यातूनच सामाजिक, आर्थिक, राजकीय बदल घडवून आणता येतो.त्यामुळे बहुजन समाज पार्टी, येवू घातलेल्या सर्व निवडणूका लढविण्यासाठी रणमैदानात उतरणार आहे. असे स्पष्ट मत बहुजन समाज पार्टीचे बीड जिल्हा संघटक ड. अशोक चंदनशिव यांनी व्यक्त केले.

बहुजन समाज पार्टीचे प्रदेश अध्यक्ष ड.सुनिल डोंगरे यांचा राज्यात दौरा सुरु आहे. त्या अनुषंगाने ते बीड येथे आले असता,ड.चंदनशिव यांच्या कार्यालयास त्यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी सर्वांशी संवाद साधत असताना, ड.अशोक चंदनशिव बोलत होते.यावेळी



बहुजन समाज पार्टीचे प्रदेश सचिव, डॉ. अनंत गायकवाड, मराठवाडा प्रभारी मुकुंद सोनवणे, जिल्हाध्यक्ष ड.बुद्धरत्न उजगरे, कोषाध्यक्ष संजय हराळ, प्रभारी प्रशांत वासनिक,ड.अमोल डोंगरे, रजनिकांत वाघमारे,कुमार फुलवरे, लक्ष्मीकांत कर्डीले,जिल्हा सदस्य योगेश पवार आदी उपस्थित होते.यावेळी बोलताना ड.अशोक चंदनशिव म्हणाले की, निवडणूक रिंगणात उतरत असतांना, पक्ष बांधणी आणि संघटन याला अधिक महत्व आहे. याबाबी परिपक्व असतील तर, रणमैदान कठीण जात नाही. त्यामुळे सर्वांना सामंजस्याने समजून घेत, आपली वाटचाल सुरु असणे आवश्यक असते. हा विचार कांशीराम आणि बहेन मायावतींनी रुजविलेला आहे. म्हणून बहुजन समाज पार्टी आजही आपले स्वायत्त स्वातंत्र्य टिकवून आहे. यानंतरही एकएक कार्यकर्ता पक्षाला जोडून राजकीय समीकरणे मजबूत करण्यासाठी आपण कार्य करत राहणार आहोत. असे विचार ड.अशोक चंदनशिव यांनी व्यक्त केले.

## नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांसाठी आंदोलन!

### तत्परता: खा.बजरंग सोनवणेंनी घेतली आंदोलकांची भेट



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील तेलगावनाका परिसरातील सर्वच भागात रस्ते, वीज, पाणी, नाल्या या नागरी समस्या कायम आहेत. या समस्यांकडे लक्ष वेधून घेण्यासाठी भागवत तावरे यांच्या नेतृत्वाखाली तेलगावनाका येथे रास्तारोको आंदोलन करण्यात आला. यावेळीखासदार बजरंग सोनवणे यांनी भेट देऊन आंदोलकांशी चर्चा करुन समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले. यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. तेलगाव नाका परिसरातील अनेक भागात रस्ते नाल्या नसल्याने नागरिकांना

अनेक समस्यांचा सामना करावा लागतो आहे. तसेच पाणीपुरवठा, विजेचा प्रश्न कायम आहे. याकडे कोणाचेच लक्ष नसल्याने लोकपत्रकार भागवत तावरे यांच्या नेतृत्वाखाली शेकडो नागरिकांनी एकत्र येत या नागरी समस्या सोडविण्याच्या मागणीसाठी आज बुधवारी (दि.४) सकाळी तेलगावनाका येथे तेलगाव रस्त्यावर रास्तारोको आंदोलन केले. यावेळी भागवत तावरे यांनी या भागातील समस्या आणि

पान २ वर...

## बुडबुडा बुडवे बहुतां

केंद्र सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार अनंत नागेश्वरन हे एक नेमस्त अर्थतज्ज्ञ असून आपल्या संयत पण अभ्यासू अभिव्यक्तीसाठी ते परिचित आहेत. सरकारी सेवेत असूनही सरकारचे आनंददूत (चीअर लीडर) म्हणून ओळखले जाऊ नये यासाठी कमालीचा संयतपणा आणि तटस्थवृत्ती अंगी हवी. ती अनंत नागेश्वरन यांच्या ठायी मुबलक असणार. सध्याच्या एका बाजूने आरती आणि दुसरीकडून टीकारती यांच्या कंठाळी दणदणाटात त्यामुळे अनंत नागेश्वरन यांच्यासारख्या व्यक्तींनी मांडलेल्या मतांची दखल घेणे आवश्यक ठरते. मुंबईत 'कॉन्फडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री' (सीआयआय) या संस्थेच्या वित्तविषयक चर्चासत्रात त्यांनी काही महत्त्वपूर्ण मुद्दे मांडले. त्यावर भाष्य करण्याआधी या संदर्भातील काही आकडेवारी देणे नागेश्वरन यांनी मांडलेला मुद्दा समजून घेण्यास उपयुक्त ठरेल.यातील सर्वात महत्त्वाचा तपशील आहे तो भारतीय भांडवली बाजारपेठेच्या सामायिक मूल्यांकनाचा. म्हणजे मार्केट कॅपिटलायझेशन या घटकाचा. आपल्या भांडवली बाजाराचे सामायिक मूल्यांकन सध्या आपल्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या (जीडीपीच्या) १४० टक्के इतके अधिक आहे. म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेच्या साधारण दीडपट अधिक आपल्या भांडवली बाजारपेठेचा– म्हणजे शेअर मार्केटचा– आकार आहे. या क्षेत्रातील फायदे आणि परताव्यांनी तर डोळे विस्फारावे अशी स्थिती. गेल्या चार वर्षांत भारतीय भांडवली बाजारात गुंतवणूक करणाऱ्यांची संख्या ९.२ कोटींपेक्षा अधिक झाली असून याचा अर्थ देशातील सुमारे २० टक्के घरांतून कोणी ना कोणी भांडवली बाजारात पैसा लावत असतो. या बाजारात एकेकाळी संस्थात्मक गुंतवणूकदारांचा (इन्स्टिट्यूशनल इन्व्हेस्टर्स) वरचष्मा असे. म्हणजे बँका, वित्तसंस्था असे शेअर बाजारात गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर करत. याचा अर्थ एकट्या–दुकट्या, किरकोळ (रिटेल) गुंतवणूकदारांचा पैसा बाजारात येण्याचे प्रमाण तसे कमी होते. आता ही स्थिती नाही. ताज्या आर्थिक पाहणी अहलावालातील तपशिलानुसार भांडवली बाजारातील किरकोळ गुंतवणूकदारांचे प्रमाण ३६ टक्क्यांवर गेले असून त्यात दिवसागणिक वाढच होताना दिसते. म्युच्युअल फंड्स, समभागांची खरेदी– विक्री करावयाची तर तसे करू इच्छिणाऱ्याचे 'डीमॅट' (डीमटेरिअलायझेशन) खाते असणे आवश्यक असते. गतसाली असे खाते असणाऱ्यांची संख्या ११ कोटी ४५ लाख इतकी होती. यंदाच्या वर्षात ती १५ कोटी १४ लाखांवर गेली आहे. आणि हे सर्व केव्हा? तर भारतीयांचे बचतीचे प्रमाण दिवसागणिक कमी होऊ लागलेले असताना. याचा अर्थ सरळ आहे. अलीकडे भारतीय हे बँक ठेवी, बचत खाते आदींत पैसे ठेवण्याऐवजी ते भांडवली बाजारात गुंतवू लागले आहेत. परिणामी आपल्या बचतीचे गेल्या वर्षीचे प्रमाण हा पाच दशकांतील नीचांक आहे. आपल्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या ५.१ टक्के भारतीयांनी बचतीत गुंतवले. त्याआधी हे प्रमाण ७.२ टक्के इतके होते. त्याच वेळी भारतीयांच्या कर्जाऊ रकमेचे प्रमाण गतसाली सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३.८ टक्के इतके होते. ते आता ५.८ टक्क्यांवर गेल्याचे रिझर्व्ह बँक सांगते. 'बचत बारगळ' या संपादकीयात 'लोकसत्ता'ने (२६ सप्टेंबर २०२३) घसरत्या बचतीवर भाष्य केले होते. त्याचा संदर्भ नागेश्वरन यांच्या ताज्या प्रतिपादनाशी आहे.याचे कारण ''भांडवली बाजारपेठेचा आकार देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा कित्येक पटींनी अधिक होतो तेव्हा अर्थव्यवस्थेच्या 'वित्तबाजारीकरणाचा' (फायनान्शियलायझेशन) धोका असतो. तो आपण टाळायला हवा'', ही नागेश्वरन यांची स्पष्टोक्ती. अशा वातावरणात सर्व लक्ष केंद्रित होते ते भांडवली बाजार आणि त्याच्या उलाढालीवर. गेले काही महिने सातत्याने चढा असलेला भांडवली बाजार निर्देशांक हे या 'आजारा'चे लक्षण. वास्तविक गतसप्ताहात केंद्राच्याच पाहणीनुसार आताच्या तिमाहीत भारतीय अर्थव्यवस्था तुलनेने मंदावली. सरासरी सात टक्के वा अधिक वेगाने वाढ अपेक्षित असताना आपण जेमतेम ६.७ टक्के इतकेच वाढलो. यातील हास्यास्पदता अशी की देशाचा अर्थविकास मंदावत असताना त्याच दिवशी भांडवली बाजाराने मात्र विक्रमी उंची गाठली. सेन्सेक्स ८२ हजारांचा टप्पा प्रथमच ओलांडता झाला. नागेश्वरन चिंता व्यक्त करतात ती नेमकी या बाबत. ''सर्व काही जेव्हा बाजारपेठकेंद्रित होते तेव्हा वित्तीय धोरणकर्ते त्या प्रभावाखाली'' येण्याचा धोका असतो. म्हणजे सर्व काही बाजारपेठकेंद्री असे जेव्हा होते तेव्हा खासगी आणि सार्वजनिक कर्जेही मोठ्या प्रमाणावर वाढून असमानता अधिक व्यापक होते, असा त्याचा अर्थ हे टाळण्यासाठी काय करायला हवे यावर नागेश्वरन यांचे प्रतिपादन आवर्जून लक्षात घ्यावे असे. ''बाजारपेठेने खऱ्या अर्थव्यवस्थेचे दास असायला हवे'', हा त्यांचा सल्ला अत्यंत सूचक. त्याचा विस्तार केल्यास लक्षात येते ते सत्य असे की भांडवली बाजाराच्या फुग्यापेक्षा अभियांत्रिकी, कारखानदारी आणि रोजगाराभिमुख उद्योगात वाढ होत जाणे म्हणजे अर्थव्यवस्थेचा खरा विस्तार आणि योग्य विकास. तसे काही होत नसेल आणि केवळ सेन्सेक्स वर वर जात असेल तर वास्तवाविषयी भ्रम निर्माण होऊ लागतो आणि अर्थप्रगतीच्या आभासास सत्य मानण्यास सुरुवात होते. भांडवली बाजारातील गुंतवणुकीमागे एकच एक विचार असतो. अधिकाधिक परतावा. सुरुवातीस गुंतवणूक फिरवाफिरवीत काही काळ असा परतावा काहींना मिळतोही. त्यांच्या त्या खऱ्याखोट्या कहाण्यांकडे आकृष्ट होऊन अन्य असे अधिक परताव्यासाठी बाजारपेठेकडे धाव घेतात. तथापि जमिनीवर अर्थव्यवस्थेचा निरोगी विस्तार होत नसेल तर केवळ बाजारपेठ किती परतावा देऊ शकते यावर कधी ना कधी मर्यादा येते आणि तसे झाले की सगळेच मुसळ केरात अशी परिस्थिती उद्भवते. ''ज्या वेळी बाजारपेठ ही अर्थव्यवस्थेपेक्षा मोठी होते त्या वेळी या बाजारपेठेच्या गरजा आणि प्राधान्यक्रम अर्थव्यवस्थेवर लादले जाणे नैसर्गिक. यातून खऱ्या आव्हानांकडे दुर्लक्ष होते आणि कर्जबाजारीपणा तेवढा वाढीस लागतो. हा सापळा आहे, तो आपण टाळायला हवा'', असे नागेश्वरन स्पष्टपणे नमूद करतात. असे होणे म्हणजे कुत्र्याने शेपूट हलवण्याऐवजी शेपटीने कुत्र्यास हलवणे, असे त्यांचे मत. हा धोका फक्त आपल्यालाच आहे असे नाही.

# सामाजिक संस्थांचे कार्य उल्लेखनिय!

## सिमा ओस्तवाल : शैक्षणिक साहित्यांचे वाटप



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

गुरु आनंद महिला प्रतिष्ठान बीड आयोजित प्रयास फाउंडेशन मुंबई यांच्या सहकार्याने बीड तालुक्यातील ग्रामीण भाग, डोंगर डोंगरपट्ट्यातील जिल्हा परिषद शाळेत विविध मान्यवरांच्या उपस्थितीत. गेल्या जून–जुलै आणि ऑगस्ट या तीन महिन्याचा कालखंडात बीड तालुक्यातील जवळपास १४२ जिल्हा परिषद शाळेमध्ये सरसकट विद्यार्थ्यांना ७० हजार वह्या,वीस हजार पेन, वीस हजार पेन्सिल, वीस हजार शॉपनर यशस्वीरित्या विविध सामाजिक, राजकीय ,शैक्षणिक, प्रतिष्ठित नागरिक, क्रीडा ,उद्योग, व्यापार, उद्योजक, प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी अशा मान्यवरांच्या हस्ते मोफत विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.

बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागात डोंगरपट्ट्यातील जिल्हा परिषद शाळा टिकावी. तसेच विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लागावी त्यांचा शिक्षणाचा दर्जा सुधरावा यासाठी विशेष करून गुरु आनंद महिला प्रतिष्ठान बीड आयोजित प्रयास फाउंडेशन मुंबई यांच्या सहकार्याने जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना सरसकट वह्या ,पेन ,शॉपनर, पेन्सिल, ते मोफत वाटप केले आहे. या तीन महिन्याच्या कालखंडात ग्रामीण भागातील डोंगर पट्ट्यातील विद्यार्थ्यांना सुद्धा शिक्षण साहित्य मोफत देण्यासाठी यशस्वी ठरल्या. जी सीमा ओस्तवाल.ह्या गेल्या तीन महिन्यापासून जिल्हा परिषद शाळेतील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दैनंदिन शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात यशस्वी झाले आहेत. या तीन महिन्याच्या कालखंडात खालील मान्यवरांच्या हस्ते अनेक जिल्हा परिषद शाळेत मोफत शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना देताना यांचे सहकार्य लाभले ते पुढील प्रमाणे सिद्धेश्वरजी माटे सर ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, शिवकुमार स्वामी सर निवासी उपजिल्हाधिकारी बीड , भगवान सोनवणे सर गटशिक्षणाधिकारी , जालिंदरजी धांडे,केशवजी कदम सर, संजयजी उडान न.प. नगरसेवक बीड खुर्शीद आलम न.प.सभापती बीड,शेख जलील उस्मान , शेख ताहेर, अनिल जाधव ,राखी सचदेव ट्विंकलिंग स्टार मुख्याध्यापक संध्या धस मॅम ,अशोक काशिनाथ,मुदीराज साहेब पोलीस निरीक्षक पेठ बीड रमेशजी घोलप प्रसिद्ध उद्योजक सुभाष मोठे सर ,अदनान खान, हाकिम मणियार सर , बल्लाळ साहेब पोलीस निरीक्षक बीड शेख शफिक भाऊ जिल्हाध्यक्ष एम आय एम बीड , हाफिज खलील साहेब, डॉक्टर बालाजी नवले, मातोश्री हॉस्पिटल व प्रमुख अतिथी म्हणून डॉक्टर निवांत नाईकवाडे साहेब ,डॉक्टर सुनील बोबडे साहेब ,डॉक्टर अजित घोडके साहेब ,डॉक्टर डोके साहेब, एमआयएम चे जिल्हाध्यक्ष एडवोकेट शफिक भाऊसाहेब, लांडगे मॅडम, चांद सर, जफर सर, अन्वर सर, मारोती खेडकर साहेब पोलीस निरीक्षक शिवाजीनगर पोलीस स्टेशन बीड ,पांडुरंग दलाई साहेब ,दत्तात्रय देशमुख सर,गणेश जाधव सर उपस्थित होते. तसेच या वेळी जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी समंदर खान सर,केंद्र प्रमुख लक्ष्मीकांत अवढाल सर,श्रीमती उषा लोंढे.भाजपा मा जिल्हाध्यक्षरमेशजी पोकळे सर, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण समिती सदस्या ड.प्रज्ञाताई खोसरे, अनिता ताई भोसले , श्वेता घाडगे,नितेश उपाध्ये , जलील सर, संतोषजी सोहनी, विक्रांत वीर सर, सय्यद नवीदुजमा मा .संचालक मौलाना आझाद, अ.म जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तुकाराम जी जाधव सर, भागवतजी वैद्य सर ,दीपक थोरात सर,कपिलजी सोनवणे , गटशिक्षणाधिकारी सोनवणे साहेब,ज्येष्ट शिक्षण विस्तार अधिकारी माटे साहेब , केंद्रप्रमुख कांबळे विनोदकुमार, मा. ईश्वर मुंडे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट , बाळासाहेब फपाळ, वाव्हळ सर,सुभाषराव पवळ, उत्तम तात्या हजारे, जाधव,संग्राम धनवे, गेवराई पंचायत समितीचे माजी सभापती मा.पांडुरंग तात्या कोळेकर,श्री .रोहित लंबे, मा.संचार उमाप अध्यक्ष शा.व्य समितीचे अध्यक्ष अनिल जेठे,तुकाराम हराळे (माजी सभापती पंचायत समिती गेवराई,संदिप सोलनकर सरपंच सौ.अनिताताई राजेंद्र कदम, समिती अध्यक्ष शरद बारहाते, पत्रकार बंधू शिक्षण विस्तार अधिकारी गोविंद शेळके,कास्ट्राईब चे जिल्हाध्यक्ष सुमेध जोगदंड सर. सरपंच सौ.साक्षीताई राजेंद्र वारंगे ,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष विकास श्रीराम तळेकर , तसेच कृष्णा आसाराम काळे, केंद्राचे केंद्र प्रमुख विष्णू मुळे सर, केंद्रीय मुख्याध्यापक श्री.महादेव चव्हाण सर, शिक्षण विस्तार अधिकारी क्षीरसागर साहेब, गावचे सरपंच प्रशांत लांडे, शालेय व्वस्थापन समिती अध्यक्ष मधुकर लांडे ,सदस्य सतीश भाऊ पाटील, संजयजी हेमराजजी बंब, लोढा शेठ नाथापूर केंद्रप्रमुख गोविंदजी सारडा ,श्री सोमनाथजी माने ,श्री .अशोकजी लोढा जिल्हा परिषद सदस्य श्री गोरख बापू डोईफोडे, शा श्री भारतरावजी नरनाळे ,वडगाव गूंधा येथील सरपंच माननीय श्रीमती गंगुताई सुधाकर रावजी नागरगोजे नंदकिशोरजी ,सुषेन नागरगोजे, जीवनजी मोरे,सरपंच वडगाव (गुंदा )गंगुताई सुधाकरजी नागरगोजे,डॉ. मनोज ओस्तवाल साहेब सुधाकरजी नागरगोजे,शिवहरी नागरगोजे,धोंडीराम अण्णा नागरगोजे, बालू तात्या नागरगोजे,लक्ष्मण तात्या नागरगोजे माजी सरपंच वडगाव गुंदा,सरपंच सोमनाथ पवार, उपसरपंच चंद्रकांत कोसले, माजी पंचायत समिती सदस्य किशोर आप्पा काळकुटे, सेवा सोसायटी चेअरमन सुखदेव , तसेच सुजाता सावंत , ज्ञानोबा वायबसे सर ,जोगदंड भैया ,सविता जैन,कपिल सोनवणे ,लक्ष्मण थोरात आदींचे सहकार्य लाभले.



## मॅराथॉन स्पर्धेत सुवर्ण पदक

सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

दि महाराष्ट्र अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि. सावली जि चंद्रपूर आंतर्गत मॅराथॉन चे आयोजन दि.०१ सप्टेबर रोजी सावली येथे करण्यात आले होते. या मॅराथॉन स्पर्धेत कू. निकिता म्हात्रे (बी ए तृतीय वर्ष, श्री पंडितगुरु पार्डिकर महाविद्यालय सिरसाळा) हिने सुवर्ण पदक पटकावले.

या सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूस ११,०००/– रूपये रोख व प्रमाणपत्र बक्षीस म्हणून देण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल संस्थाध्यक्ष, मा. आ. व्यंकटराव कदम साहेब, सचिव, योगेश भैय्या कदम, संस्थेचे सर्व संचालक, प्राचार्य डॉ के के पाटिल, क्रीडा संचालक, डॉ ए डी टेकाळे, शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख, डॉ विठ्ठल भोसले आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व शूभेच्छा दिल्या.

## पान एक वरून

**गेवराई तालुक्यात ओला**

खरिपाच्या पिकांना फटका बसल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास अक्षरशः हिरावला गेला आहे. कपाशीची बोंडे पाण्यात गेल्याने शेतकऱ्यांच्या हाती उत्पादनाची आशा मावळली आहे. तसेच काही शेतात जी काही पिके शिल्लक राहिली आहेत, त्यांच्यावर विविध रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता निर्माण संपूर्ण पिके उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे तालुक्यातील खरीप हंगामातील पीक वाया गेल्याने शासनाने ओला दुष्काळ जाहीर करावा व हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना तत्काळ सरसकट नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी मयुरी मस्के–खेडकर यांनी केली आहे.

**आ.नितेश राणेवर गुन्हा**

दिला आहे. तसेच मी इस्लाम धर्म मानीत असतांना मला असे एकविण्यात आले की, 'मोहम्मद पैगंबर यांचे जिवन चरित्र एकविण्यात आले असता त्यांचे पन्नासव्या वर्षी एका सहा वर्षीय मुलीसोबत विवाह करतो. आयेशा ज्यांचा नाय आहे. जो मनुष्य त्यांचे आदर्श असे आहेत ते कसे वागवतील आणि त्या मुस्लीम धर्मामध्ये ज्या स्त्रिया वरती जे अत्याचार घडतात त्यांचे आदर्शच अत्याचांरी होते त्यांचे ऐकुण काही सांगायचे कारण नाही. कारण वस्तुस्थिती अशी आहे. आजच्या काळामध्ये आज भारतात एक कोटी मुस्लीमांनी त्यापेक्षा जास्त मुस्लीमांनी इस्लाम धर्म सोडलेला अशी माहिती प्रवचन मध्ये दिली मुस्लिमांना स्वतःच्या जीव प्रेषित मुहम्मद पैगंबर यांचा सम्मान महत्वाचा असल्याने रामगिरीची व्हीडीओ क्लीप व्हायरल होताच संपुर्ण देश भरात मुस्लिम समाज तर्फे निषेध मोर्चे अनेक ठिकाणी महाराजवर ऋखठ सुद्धा दाखल झालेली आणि त्याला अटक करण्याची मागणी जोर धरत आहे एका आरोपीच्या समर्थनार्त १ सप्टेंबर २०२४ रोजी भाजप आमदार नितेश राणे यांनी श्रीरामपूर अहमदनगर जिल्ह्यात सकल हिंदू समाज आयोजित एका मोर्च्यात आ.नितेश राणेनी भाषणात मुस्लिम समाजाला टार्गेट करत शिविगाळ केली तसेच धमकी दिली आहे मस्जिदों में आकर चुन–चुनकर मारेंगे या मुळे मुस्लिम समाजात रोष असुन समाजाचे भावना दुखावले आहे. राज्यातील कायदा व सुव्यवस्था चा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून नेहमी जातीय–धार्मिक तेढ वाढेल अशी प्रक्षोभक बेताल वक्तव्य तो जाणूनबूजून करत आहे. न्यायाच्या दृष्टीने आमदार नितेश राणेवर भारतीय न्याय संहिता( बीएनएस) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात यावा या मागणीसाठी ठिय्या आंदोलन करण्यात आले होते

**शेकापने केलेल्या मागण्या**

नुकसानीची एकरी लाख रुपये नुकसान भरपाई व १००% पीक विमा लागू न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे मध्यवर्ती समिती सदस्य भाई ड नारायण गोले पाटील, तालुका चिटणीस भाई मुंजा पांचाळ, भाई चांगदेव शेजुळ, पुरोगामी युवक संघटनेचे तालुका अध्यक्ष अशोक बाप्पा कुलकर्णी, पुरोगामी युवक संघटनेचे तालुका चिटणीस भाई आनंत चव्हाण, शेतकरी कामगार पक्षाचे तालुका सहचिटणीस भाई राहुल सोळंके भाई सतीश शेजुळ,भाई राधाकृष्ण पांचाळ, भाई श्रीराम शेवाळे, शेतकरी सभेचे तालुका अध्यक्ष भाई सुदाम चव्हाण, शेतकरी सभेचे तालुका चिटणीस भाई माऊली चंदनशिव, भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण, भाई विष्णू शेळके, भाई भास्कर कांबळे, भाई राजेभाऊ शेरकर आदी उपस्थित होते होते.

**विश्वशांती बुद्ध विहाराचे**

विक्रम काळे, रमेश कराड, अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांचीही उपस्थिती होती. सुरूवातीला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते कोनशिलेचे अनावरण, फीत कापून विहाराचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी राष्ट्रपती यांनी विहारातील गौतम बुद्ध यांच्या मूर्तीस, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी बुद्ध वंदना झाली. वंदनेनंतर उपस्थित बौद्ध भिक्कूंना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू चिवर दान केले. बौद्ध भिक्कू यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना गौतम बुद्धांची मूर्ती भेट दिली. क्रीडा मंत्री बनसोडे यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

**वृत्तपत्र कर्मचाऱ्यांना कोटींचे**

त्यांच्या कुटुंबियांवर मोठे आर्थिक संकट ओढावते. यामुळे वृत्तपत्र क्षेत्रातील कर्मचारी, वृत्तपत्र वाटप करणाऱ्या मुलांना अपघाती विमा संरक्षण देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पुढाकार घेतला. बीड जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्यावतीने आयोजित कार्यक्रमात डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या उपस्थितीत दि.१३ ऑगस्ट रोजी प्राथमिक स्वरुपात कर्मचाऱ्यांचा अपघाती विमा काढण्यात आला. डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमात आतापर्यंत २२० वृत्तपत्र कर्मचाऱ्यांना ११ कोटींचे विमा कवच देऊन डॉ. क्षीरसागर यांनी कायम श्रमिक कर्मचाऱ्यांच्या पाठिशी असल्याने सिध्द केले आहे.

**नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांसाठी**

लोकांच्या भावना खासदार सोनवणे यांच्या समोर मांडल्या तर धनंजय गुंदेकर यांनी बीड–परळी रस्ता थोडाही पाऊस झाला की, चिखलात हरवून जात असल्याचे सांगितले तर येथील खड्ड्यात सुफियान मणियार यांनी पाण्यात झोपून आंदोलन केले. यावेळी खासदार सोनवणे यांनी आंदोलकांशी चर्चा करुन सर्वच प्रश्न निकाली काढण्याचे आश्वासन दिले. आंदोलकांचे समाधान झाल्याने आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. तर पेठ बीड पोलिसांनी तगडा बंदोबस्त ठेवला होता.

## पान सहा वरून

**अतिवृष्टीमुळे पिकांचे**

सुकू लागलेली आहेत. याला आकस्मिक मर असे म्हणतात. कपाशीच्या आकस्मिक मर मध्ये दीर्घकाळ पाण्याचा ताण पडल्यानंतर जमिनीचे तापमान वाढलेले असते. अशावेळी सिंचन दिल्यास अथवा पाऊस पडल्यास झाडाला धक्का बसून अचानक झाड सुकते आणि कालांतराने झाडाची पाने गळतात. सिंचन दिल्यानंतर किंवा पाऊस पडल्यानंतर ३६–४८ तासांत आकस्मिक मर ची लक्षणे दिसू लागतात. सुकल्यानंतर पानगळ होऊन कालांतराने झाडे मरतात त्यामुळे उत्पादनात मोठे नुकसान होऊ शकते. आकस्मिक मर व्यवस्थापन १. अतिरिक्त पाण्याचा लवकरात लवकर निचरा करवा. २. वापसा येताच कोळपणी व खुरपणी करावी. ३. लवकरात लवकर २०० ग्रॅम युरिया+ १०० ग्रॅम पांढरा पोटॅश (००:००:५० खत ) + २५ ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड प्रति १० लिटर पाण्यात मिसळून तयार द्रावणाची प्रति झाड १०० मिली याप्रमाणे आळवणी करावी. किंवा १ किलो १३:००:४५ + २ ग्रॅम कोबाल्ट क्लोराईड + २५० ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड २०० लिटर पाण्यातून मिसळून तयार द्रावणाची प्रति झाड १०० मिली आळवणी करावी. ४. वरील प्रमाणे द्रावणाची आळवणी केल्यानंतर सुकू लागलेल्या झाडाजवळची माती पायाने लवकरात लवकर दाबून घ्यावी. वरील सर्व उपाययोजना शेतामध्ये झाडे सुकू लागलेली दिसताच लवकरात लवकर म्हणजे २४ ते ४८ तासाच्या आत कराव्यात जेणेकरून पुढील होणारे मोठे नुकसान वेळीच टाळता येईल. या सोबतच ट्रायकोडर्मा विरीडी या बुरशीची आळवणी करावी, १००सा /१० लिटर प्रमाणे अशी माहिती कृषी विभागा मार्फत तालुका कृषी अधिकारी जे.बी.भगत यांनी दिली.

**राष्ट्रपतींच्या हस्ते यथोचित**

मांडले आहे पुरस्कार स्वीकारताच नाशिक येथील देवळाली मतदारसंघात कार्यकर्त्यांनी जल्लोष केला अनेक ठिकाणी कार्यकर्त्यांनी पेढे वाटून आनंद साजरा केलापुरस्काराबद्दल प्रतिक्रिया देताना आ अहिरे म्हणाल्या की हा पुरस्कार माझ्या मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिकांचा गौरव आहे आ सरोजताई अहिरे ह्या राहुरी येथील सुप्रसिध्द डॉ केतन वाघ – साळवे यांच्या वहिनी आहेत

**बुद्ध आणि धम्म ग्रंथ वाचनास**

व्यापक अशा पद्धतीची संकल्पना होती. परंतु दीक्षा घेतल्यानंतर अवघ्या काही महिन्यांमध्येच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाले. आणि बौद्ध धम्म प्रचार आणि प्रसाराला फार मोठी खीळ बसली. परंतु त्यांचे सुपुत्र भैयासाहेब आंबेडकर यांनी, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे महान कार्य हाती घेतलं. चैत्यभूमीची निर्मिती केली. बौद्धाचार्यांची निर्मिती केली आणि संपूर्ण भारतभर बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार फार मोठ्या प्रमाणात करायला सुरुवात केली. कालांतराने सूर्यपुत्र भैयासाहेब आंबेडकर यांचे निर्वाण झालं. पुन्हा एकदा धम्माची गती कमी होते की काय असे वाटू लागले. परंतु डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या सुनबाई ममता सागर महाउपासिका मीराताई आंबेडकर यांनी बौद्ध धम्माची प्रचार व प्रसार करण्याची धुरा आपल्या खांद्यावर घेऊन भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून संपूर्ण भारतभर बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार करायला सुरुवात केले. अडीच हजार वर्षांपूर्वी जसे पावसाळ्यामध्ये तथागत भगवान गौतम बुद्ध एकाच ठिकाणी बसून, भिकू संघाला मार्गदर्शन करायचे, मार्गदर्शित झालेला भिकू संघ हा दाही दिशेला बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार करायचा. त्याचीच पुनरावृत्ती भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून आणि मीराताई आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय बौद्ध महासभेचे कार्याध्यक्ष भीमराव यशवंत आंबेडकर यांच्या मार्गदर्शनानुसार संपूर्ण भारत देशामध्ये आषाढी पौर्णिमा ते अश्विनी पौर्णिमा या तीन महिन्याच्या कालखंडामध्ये संपूर्ण भारत देशामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर लिखित, बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचन सुरू आहे. प्रत्येक गावात, खेड्यापाड्यात, गल्लोगल्लीत, तालुक्यात, जिल्ह्यात, राष्ट्रात, फार मोठ्या प्रमाणामध्ये बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ, वाचायला सुरुवात झालेली आहे. त्याचाच एक भाग म्हणून भीम नगर तालुका वडवणी जिल्हा बीड या ठिकाणी बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ सतत वाचून असंख्य लोकांना बुद्ध तत्त्वज्ञानाकडे वळवण्याचं काम भीम नगर मधील भारतीय बौद्ध महा सभेच्या कार्यकर्त्या त्या उत्साहाने करीत आहेत. भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष प्रकाश तुळशीराम खळगे सर यांनी संपूर्ण तालुक्यामध्ये बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचण्यासाठी तालुक्यातील अनेक गावांना भेटी देऊन प्रत्येक गावागावांमध्ये ग्रंथ वाचण्यासाठी लोकांना प्रभावित केले आहे. तसेच भारतीय बौद्ध महासभेच्या तालुका उपध्यक्षा सौ. शीलाताई सुखदेव उजगरे, संस्कार उपाध्यक्ष श्रीमती अग्री अण्णाभाऊ खळगे यांच्या सहकार्याने तालुक्यातील प्रत्येक गावांमध्ये ग्रंथाचे वाचन उत्साहामध्ये सुरू आहे. मौजे भीम नगर या ठिकाणी या ग्रंथ वाचनास फार मोठ्या प्रमाणामध्ये प्रतिसाद मिळत आहे. अनेक मुला–मुलींना चांगल्या पद्धतीचे वळण लागले आहे. बौद्ध तत्त्वज्ञानाकडे त्यांचा कल वाढत आहे. म्हणून वडवणी तालुक्यातील भीम नगर तसेच नागवंशी बुद्ध विहार, मौजे पिंपरखेड, कवडगाव, देवडी, खळवट लिमगाव, देवळा या ठिकाणी बौद्धमय वातावरण तयार झाले आहे. भारतीय बौद्ध महासभेच्या सर्व कार्यकर्त्या या महान कार्यानिमित्त सहभागी होतात. त्यामध्ये वृंदावनी उजगरे, सागरबाई उजगरे, कलावतीबाई उजगरे, सीताबाई जाधव, अनुसयाबाई उजगरे, शोभाताई उजगरे, राहीबाई उजगरे आदी भारतीय बौद्ध महासभेच्या महिला परिश्रम घेतात आणि परिसरातील असंख्य बौद्ध उपासक, उपासिका या ग्रंथ श्रवण करण्यास उपस्थित असतात. त्यामुळे वडवणी परिसरातील भीम नगर आणि नागवंशी बुद्ध विहार,तसेच खेड्या पाड्यात चैतन्याचे वातावरण निर्माण झालेलं आहे. संपूर्ण तालुक्यामध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# जीवाचीवाडीसह परिसरात अवैध धंदे!

**बोंबला** महिला सरपंचाच्या मागणीला केराची टोपली

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील जीवाची वाडी,तुकूची वाडीसह परीसरात विना–परवाना देशी–विदेशी बनावट दारू खुले आम विक्री होत असलेचे लेखी निवेदनासह ग्राम पंचायतचा ठरावाची सत्यप्रत गावच्या प्रथम नागरीक तथा महिला सरपंच,श्रीमती प्रेरणा दिपक काळे सह ग्रामपंचायत कार्यालय,जीवाची वाडीचे पद्अधिकारी व दोन्ही गावातील महिला यांनी पुढाकार घेऊन दर वर्षा प्रमाणे याही वर्षी पोलीस अधिक्षक,बीड.यांना तारीख ०२ऑगष्ट–२०२४ रोजी प्रत्यक्षात एस पी कार्यालयात जाऊन ठरावासह निवेदन दिले, त्या निवेदनाच्या प्रतिलिपी विभागीय पोलीस आयुक्त कार्यालय,छत्रपती संभाजीनगर. तहसीलदार,केज. अप्पर पोलीस अधिक,अंबाजोगाई.पोलीस उपाधिक्षक,केज.अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क,बीड.पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे,केज.यांना कळऊन महिना झाले,परंतु कोणाचीही कारवाही केली गेली नाही विनापरवाना देशी विदेशी बनावट दारू विक्री रोखण्यास सबंधीत नियंत्रण विभाग अपयशी असून ना.पालकमंत्री धनंजय मुंडे यांना कार्यक्रमात निवेदन देऊनही दारु विक्री रोखन्याय यंत्रणा पुर्णतःअपयशी असलेचे परीसरात उलटसुलट चर्चा ऐकवयास मिळत आहे.

### दारु मीळुन आली नाही?

विडा बिट चे पोलीस सहाय्यक उपनिरिक्षक राजु वाघमारे यांचेशी विचारले आसता जिवाचीवाडी येथे आपण प्रत्यक्ष भेट दिली आसता कोठेही अवैध दारु विक्री होताना आढळुन आली नाही.त्यामुळे तिन पंचनामे केल्याची व जीवाची वाडीसह परिसरात एकही धाबा नाही अशी माहीती त्यांनी लोकमतशी बोलताना दिली. जीवाची वाडी येथे एकही धाबा नाही.

### दारु विक्री चालुच...

जिवाचीवाडी येथील दारू विक्री बंद करण्याची निवेदनाद्वारे मागणी करणाऱ्या महिला सरपंच, प्रेरणा दिपक काळे यांच्याशी संपर्क साधला आसता,पोलीस अधीक्षक यांना निवेदन देऊनही पोलीसांनी अद्याप कारवाई केली नाही.त्यामुळे सर्रास दारु विक्री सुरु असल्याची माहीती त्यांनी लोकमतशी बोलताना दिली.



# अज्ञात वाहनाच्या धडकेत काळवीट मृत्यूमुखी



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आज दि.(३ ) मंगळवार रोजी सायंकाळी साडे ५ वाजता धुळे ते सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा ते चौसाळा दरम्यान रौळसगाव येथील सरपंच हॉटेलजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत काळवीट गंभीर जखमी झाले होते.

याची माहिती डॉ.गणेश ढवळे यांना भोसले यांनी कळवली.त्यानंतर डॉ.गणेश ढवळे यांनी बीड वनपरिक्षेत्र अधिकारी काकडे यांना फोनवरून वरील घटनेची माहिती दिली. काकडे यांनी वनविभागातील कर्मचारी घटनास्थळी पाठवले परंतु तोपर्यंत काळवीट मृत्यूमुखी पडले होते.

# जिवाचीवाडीत पावसाने पीकांचे नुकसान!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील जिवाचीवाडी मधिल एडकावस्ती परिसरात संततधार पावसामुळे शेतीचे खूप नुकसान झाले आहे.या परिसरात पावसाचा जोर वाढल्याने शेतीची स्थिती खूपच बिकट झाली आहे, ज्यामुळे शेतकरी त्रस्त आहेत.पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान कापूस, सोयाबीन, तुर, मुग, उडीद बाजरी या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पावसामुळे पाण्याचे तळे तयार झाले आहे,ज्यामुळे पिकांचा ऱ्हास मोठ्या प्रमाणात दिसून येतो. शेतकऱ्यांचे कष्ट आणि आर्थिक नुकसानीची तीव्रता विचारात घेता, ही परिस्थिती खूपच गंभीर आहे.प्रशासनाकडे मागणी केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथिल शेतकरी नागरीकांनी प्रशासनाकडे पिकांच्या पंचनाम्याची मागणी केली आहे. गणनांकडे पाठवलेली तक्रारींची संख्या वाढलेली आहे आणि शेतकरी पंचनाम्याच्या माध्यमातून मदतीची अपेक्षा करत आहेत.पंचनामा होऊन नुकसानभरपाई मिळावी या उद्देशाने त्यांनी ही मागणी केली आहे.

# ग्रीन क्लबला पुरस्काराने सन्मानित

## अभिनंदनिय : बंकटस्वामी महाविद्यालयाचे कौतुक

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयाला महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग व युवकांच्या (र्धीह र्डीवशर्पीं)मार्फत नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण व पाण्याची बचत हे अभियान राबविले जात आहे.राज्यातील निवडक तेरा जिल्ह्यामध्ये या अभियानाची सुरुवात शैक्षणिक वर्ष २०२३–२०२४ मध्ये करण्यात आली होती.यामध्ये पाण्याची बचत अभियानांतर्गत ग्रीन क्लब स्थापन करून पाणी बचतीच्या उपयोजनासाठी ग्रीन क्लबच्या माध्यमातून सात सहज करण्याजोग्या कृती योजना राबविल्या जात आहेत. यामध्ये गळक्या नळाची दुरुस्ती,शॉवर ऐवजी बादलीने पाणी वापरणे, दात घासताना किंवा दाढी करताना पाणी वाया जाणार नाही याची काळजी घेणे, ग्रामीण भागात शोष खड्डे बनविण्यास प्रवृत्त करणे.असे अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत. युवकांमध्ये पाणीबचतीचे महत्त्व व वर्तनपरिवर्तन या दोन गोष्टी या अभियानातून करण्यात येत आहेत. यासाठी जागतिक जल दिनाच्या निमित्ताने ग्रीन क्लबच्या वतीने विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते यामध्ये उत्कृष्ट ग्रीन क्लब पाणीबचतीच्या उपयोजनावर उत्कृष्ट पोस्टर, पाणी बचतीच्या अनुषंगाने उत्कृष्ट रिल/शॉर्ट व्हिडिओ बनविणे या प्रकारच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या.अशा अनेक विविध उपक्रमांच्या माध्यमातून व व्हाय वेस्ट अपद्वारे केल्या जाणाऱ्या कृतीयुक्त प्रोग्राम या सर्व स्पर्धेमधून बीड जिल्ह्यातील तीन महाविद्यालयांची निवड उत्कृष्ट ग्रीन क्लब मध्ये करण्यात आली यामध्ये श्री बंकटस्वामी महाविद्यालयाचा उत्कृष्ट ग्रीन क्लब म्हणून निवड करण्यात आली आहे.यामध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागाद्वारे तज्ञ समितीद्वारे मूल्यांकन करून पुरस्कार महाविद्यालयांना निवड करण्यात आले. श्री बंकटस्वामी महाविद्यालयातील ग्रीन क्लब फॅकल्टी कोऑडीनेटर डॉ. शंकर धांडे, डॉ.जगन्नाथ चव्हाण ,डॉ. प्रकाश कोंका यांनी या अभियानामध्ये विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती तसेच विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावर्षी उत्कृष्ट ग्रीन क्लब पुरस्कार महाराष्ट्र शासनाचा प्राप्त झाल्यामुळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक मिरगणे,उपप्राचार्य डॉ.शिवाजी मोरे कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. ब्रम्हनाथ मेंगडे कार्यालयीन अधीक्षक श्री शिवाजी भारती तसेच श्री कल्याण सावंत यांनी ग्रीन क्लब कोऑडीनेटर यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.




# शेख जैतूनबी बाबामियाँ याचे निधन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी



ज्येष्ठ नागरिक शेख जैतूनबी बाबामियाँ यांनी नुकतेच दिनांक ९ जुलै २०२४ रोजी आपल्या वयाची शंभरी पूर्ण केली होती. वयाची शंभरी पूर्ण केल्यानंतर दोन महिन्यांनी काल दिनांक ३ सप्टेंबर २०२४ मंगळवार रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

बीड शहरातील मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांच्या त्या आत्या तथा मरहूम पोलीस पाटील शेख बाबामियाँ यांच्या पत्नी होत्या. त्यांचा जन्म ९ जुलै १९२४ रोजी अहेमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात असलेल्या चिचोंडी (शिराळ) येथे झाला होता. काल दिनांक ३ सप्टेंबर २०२४ मंगळवार रोजी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांची नमाज ए जनाजा सकाळी ०९:०० वाजता बेलापूर येथे पठण करण्यात आली तर दफनविधीही तेथील कब्रस्तानात करण्यात आला. त्यांच्या मागे पाच मुले–सुना, दोन मुली–जावई, नातवंडे–पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे बीड, चिचोंडी शिराळ, दर्गाह दायरा आणि एकलहरे येथे शोककळा पसरली आहे. शेख कुटुंबीयांच्या दुःखात दैनिक पुण्यभूमी परिवार सहभागी आहे.




# मर रोगावर तात्काळ उपायोजना करा

## राजेंद्र आमटे :शिवसंग्राम शेतकरी आघाडीचे निवेदन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शेतकऱ्याने पोटच्या पोरा पेक्षा जास्त जपलेलं कापसाचे पीक अचानक आलेल्या मर रोगा मुळे नेस्तनाबूत होत आहे. शेतात उभे असणारे एककर दोन दोन एक्कर पीक जमिनीला भुई सपाट होत आहे. आणि आपला वाझोटा कृषी विभाग शेतकऱ्याच्या कापसाच्या पिकाचे वाटोळे होत असताना शांत का? कृषी विभागाने तातडीने उपाय योजना करून कापसावर झालेल्या मर रोगावर नियंत्रण करावे कृषी विभाग मार्फत शेतकऱ्यांना तत्काळ रोग नियंत्रण साठी मदत देण्यात यावी मर रोगामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान तत्काळ थांबवण्यासाठी कृषी विभागाने उपाय योजना कराव्यात या मागणी साठी शिवसंग्राम शेतकरी आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय निवेदन देण्यात आले लवकरात लवकर शेतकऱ्यांचे नुकसान भरपाई चे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अन्यथा शिवसंग्राम शेतकरी आघाडी वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, सरचिटणीस सुहास पाटील, शेलेश सुरवसे, रामचंद्र बरडे, अच्युत सुरवसे, राम सपकाळ, सुधाकर काकडे, संजय तीपाले, रमेश जगताप, सुभाष सपकाळ, मोहन गव्हाणे, कृष्णा मसुरे आदीच्या स्वाक्षरीने निवेदन देण्यात आले.

# पैठण नुकसानग्रस्त शेतीची पाहणी

## आदित्य ठाकरे:सरकारने सरसकट नुकसान भरपाई द्यावी



पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

युवा सेना प्रमुख, शिवसेना नेते आदित्य ठाकरे पैठण दौऱ्यावर आले असता त्यांनी आज पैठण तालुक्यातील पाचोड येथील श्री राजू सेठी या शेतकरी बांधवांच्या नुकसान झालेल्या शेतीची पाहणी केली. सध्या मोठ्या प्रमाणावर झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले असून यामुळे शेतकरी राजा हतबल झाला आहे. प्रशासनाने तातडीने पंचनामे करून लवकरात लवकर मदत जाहीर करणे अत्यंत आवश्यक आहे. गद्दार सरकारने शेतकरी बांधवांच्या झालेल्या नुकसानीमध्ये कसलेही राजकारण न करता सरसकट नुकसान भरपाई द्यावी.

तसेच या कठीण प्रसंगी शिवसेना शेतकरी बांधवांच्या पाठीशी असल्याची ग्वाही यावेळी आदित्य साहेब ठाकरे यांनी दिली.याप्रसंगी शिवसेना नेते संजय राऊत, चंद्रकांत खैरे, शिवसेना नेते विधान परिषद विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे,उपजिल्हाप्रमुख दत्ता गोर्डे, तालुकाप्रमुख मनोज पेरे, आनंद भालेकर, विधानसभा संघटक बद्रीनारायण भुमरे,युवासेना सहसचिव धर्मराज दानवे, शुभम पिवळ, युवतीसेना अश्विनी पवार तसेच शेतकरी बांधव उपस्थित होते.

# शाडू मातीच्या गणेशमूर्ती कार्यशाळा!

## डॉ.दीपाताई क्षीरसागर : सहभागी होण्याचे आवाहन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची घटकसंस्था असलेली बालरंगभूमी परिषद बीड जिल्हा शाखेतर्फे आज (दि.५) सकाळी १०.३० वाजता इकोफ्रेंडली–शाडू मातीच्या गणेशमुर्ती बनवण्याची कार्यशाळा घेण्यात येणार असल्याची माहिती बीड बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष डॉ.दीपा क्षीरसागर यांनी दिली आहे.

सौ.के.एस.के.महाविद्यालयाच्या परिसरात होणार्या कार्यशाळेत शाळेच्या ६ ते १५ वयोगटातील विद्यार्थिंनींनी सहभाग नोंदवावा. गणेश मुर्तीसाठी माती उपलब्ध करून दिली जाईल. सहभागी कलावंताना सहभाग प्रमाणपत्र दिले जातील. याशिवाय विद्यार्थ्यांनी बनविलेला गणपती त्यांना घरी नेता येईल. पर्यावरणपूरक गणेश उत्सव व्हावा, हा उद्देश समोर ठेवून बीड बालरंगभूमी परिषद उपक्रम राबवत आहे. या आधी देखील छत्री रंगवा, लोकवाद्य प्रशिक्षण, प्रदर्शन, बाल कलावंतासाठी लोककला महोत्सव व स्पर्धा घेण्यात आल्या आहेत. बाल प्रेक्षक सभासद योजना देखील सुरू आहे. तरी गणपती बनवा कार्यशाळेला उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर, डॉ.संजय पाटील देवळाणकर, स्नेहल पाठक, शाहीर विलास सोनवणे, सुरेश साळूंके, दीपक जमधाडे, अमित गाडे, विजय राख, अनुराधा चिंचोलकर, डॉ.विश्वांभर देशमाने, अक्षय फुलझळके आदींनी केले आहे. अधिक माहितीसाठी प्रा.दीपक जमधाडे ८८८८८५०३५८, अमित गाडे ८८८८९५५७९२ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

**अस्मानी** २९ हजार १२२ शेतकरी झाले बाधित

# अतिवृष्टीमुळे सर्वांनाच बसला फटका!

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव सह तालुक्यात रविवारी रात्री व सोमवारी झालेल्या अतिवृष्टीच्या तडाख्यात ७२ गावातील २९ हजार १२२ शेतकरी बाधित झाले आहे सलग दोन दिवसांच्या अतिवृष्टी मुळे सोयगाव तालुक्यात १५ हजार ७५७ हेक्टरवर ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झाल्याचा अहवाल कृषी आणि महसूल यांनी बुधवारी जिल्हा प्रशासनाकडे पाठविला असल्याचे तहसीलदार मनीषा मेने जोगदंड यांनी सांगितले आहे त्यामुळे या बाधित क्षेत्राची पंचनामे सोमवार पासून होणार असल्याची माहिती तहसीलदार मनीषा मेने जोगदंड यांनी दिली आहे

सोयगाव शहरासह तालुक्यात रविवारी व सोमवारी सलग दोन दिवस मुसळधार पाऊस झाला आहे तर सोयगाव आणि जरंडी या दोन मंडळात सलग अतिवृष्टी ची नोंद झाली आहे या अतिवृष्टी च्या तडाख्यात कापूस मका सोयाबीन मूग आणि उडीद या पिकांचे ३३ टक्क्यांच्या वर नुकसान झाले आहे त्यामुळे शासनाच्या निकषांनुसार या दोन्ही मंडळात अतिवृष्टी च्या नुकसानीची पंचनामे होणार आहे दरम्यान तालुक्यात सलग दोन दिवस सरासरी १४४ मी मी पावसाची नोंद झाली असून सोयगाव तालुका शासन निर्णयाअन्वये ओल्या दुष्काळाच्या छायेत आहे दरम्यान सोयगाव गलवाडा वेताळवाडी जरंडी निंबा यती घोसला या गावात अतिवृष्टीमुळे नद्यांच्या पुराचे पाणी शेतात शिरून २१ हेक्टरवर शेत जमीन पिकांसह खरडुन वाहून गेली आहे कृषी आणि महसूल विभागाकडून नुकसानीची पाहणी हाती घेतली आहे पंचनामे करण्यासाठी चे आदेश प्राप्त होताच महसूल कृषी आणि पंचायत या विभागाचे संयुक्त पथकाचे आदेश काढण्यात येऊन सोमवार पासून सोयगाव तालुक्यात बाधित पिकांची व क्षेत्रांचे पंचनामे करन्यात येतील असे महसूल चे नायब तहसीलदार संभाजी थोटे यांनी सांगितले



### नद्यांचे पूर ओसरले

सोयगाव तालुक्यातील सोयगावची सोना नदी, रुद्रेश्वर, जरंडीची खडकी सुकी नदी, घोसला,बनोटी ची हिवरा नदी या नद्यांच्या पूर बुधवरी पहाटे ओसारले आहे.

# प्राचार्य पदाची सोपविल धुरा

## निवड: नवगण महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ.मधुकर आघाव

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये गेल्या २८ वर्षापासून प्राध्यापक म्हणून कार्यरत असणारे डॉ मधुकर आघाव यांची नुकतीच महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी नियुक्ती करण्यात आलेली आहे.

परळी तालुक्यामध्ये राजकीय, शैक्षणिक, औद्योगिक आणि सामाजिक क्षेत्रामध्ये डॉ आघाव यांची यशस्वी वाटचाल राहिलेली आहे. वैद्यनाथ उद्योग समूहाचे चेअरमन म्हणून त्यांनी अनेक फॉर्म यशस्वी चालविल्या आहेत. जिल्हा परिषद सदस्य म्हणूनही त्यांनी उत्तम कार्य केलेले आहे. वाणिज्य विषयांमध्ये डॉक्टरेट पदवी



मिळाल्यानंतर त्यांची वाणिज्य व इतर सांस्कृतिक क्षेत्रातील काही पुस्तके प्रकाशित आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकामध्ये त्यांचे शोधनिबंध प्रकाशित झालेले आहेत. त्यांच्या प्रशासकीय कामांचा लाभ महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी व्हावा व संस्थेची जबाबदारी उत्तम रीतीने पार पाडावी म्हणून क्षीरसागर कुटुंबीयांनी त्यांच्यावर विश्वास दर्शविलेला आहे. त्यांच्या या निवडीबद्दल पालकमंत्री श्री धनंजय मुंडे साहेब यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे तसेच संस्थेचे सचिव डॉ भारतभुषणजी क्षीरसागर संस्थेच्या मार्गदर्शक डॉ दीपाताई क्षीरसागर, राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष युवा नेते डॉ योगेश भैय्या क्षीरसागर, डॉ सारिकाताई क्षीरसागर तसेच नवगण महाविद्यालयाच्या स्थानिक सल्लागार समितीचे डॉ अनिल घुगे, श्री बाळासाहेब देशमुख, श्री उदगीरकर, संस्थेच्या प्रशासकीय समितीचे श्री देशमाने सर, श्री गुट्टे सर, उपप्राचार्य डॉ लालासाहेब घुमरे इत्यादींनीही त्यांच्या या निवडीबद्दल अभिनंदन केले आहे. डॉ आघाव यांच्या निवडीमुळे परळीच्या शैक्षणिक वातावरणात उत्साह दिसून येत असून महाविद्यालयाच्या कर्मचारी व विद्यार्थ्यांनी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले आहे.

**सुविचार** - एखादी संधी येण्याची वेळ पाहू नका स्वतःच संधी निर्माण करा.

# लाडक्यांचे लाड...!

लोकशाहीत सरकार या संस्थेने देशातील शेवटच्या नागरिकाचे हित डोळ्यासमोर ठेवून कारभार करणे अपेक्षित असते. देशाच्या नागरिकांमध्ये कोणत्याही आधारावर कोणताही पक्षपात सरकारकडून अपेक्षित नसतो. असा पक्षपात केला जात असेल तर तो लोकशाही मूल्याचा अवमान ठरतो, अर्थात ही एक आदर्श अपेक्षा म्हणावी लागेल. आजपर्यंत कोणत्याही सरकारने शेवटच्या माणसाच्या हिताला प्राधान्य देऊन धोरणे निश्चित केलेली नाहीत, निर्णय घेतलेले नाही. काही मूठभर संघटितांच्या हितासाठी सरकार काम करीत असते. देशभरातील लाखो नव्हे कोट्यवधी शेतकरी आपल्या उत्पादनाला किमान उत्पन्न खर्च निघावा इतका तरी भाव मिळावा यासाठी आक्रोश करीत असताना त्यांच्याकडे ढुंकूनही पाहण्यास तयार नसताना जेमतेम पाच टक्के असलेल्या सरकारी कर्मचारी वर्गाची मागणी मात्र अर्थविषयक शहाणपणास तिलांजली देत मान्य केली जात आहे. खरे तर निवृत्तीवेतन ही संकल्पना आता कालबाह्य झाली आहे. जगातील कोणत्याही देशात अशाप्रकारे तहहयात निवृत्तीवेतन दिले जात नाही. अमेरिकेसारख्या देशात तर सरकारी नोकरी कायम राहील याचीही शाश्वती नसते. तिथे 'हायर ॲण्ड फायर' पद्धतीने दरवर्षी कंत्राटी स्वरूपात नेमणुका केल्या जातात. भारतात किमान सरकारी नोकरदार वर्गाला ही भीती तरी नाही. एकदा नोकरीत लागले की अगदीच गंभीर गुन्हा हातून घडला तरच नोकरी जाण्याची भीती असते, एरवी तुमची नेमणूक ज्या कामासाठी झाली ते तुम्ही प्रामाणिकपणे करता की नाही, हा अतिशय दुय्यम भाग ठरतो. मोठ्या पदावरील नोकरशहांचा भ्रष्टाचार हा तर चावून चोथा झालेला विषय आहे. आजपर्यंत कोणत्याही सनदी नोकरशहाला ज्ञात उत्पन्न स्त्रोतापेक्षा अधिक मिळकत असल्याच्या कारणावरून तुरुंगात पाठविणे तर दूर राहिले साधे नोकरीतून कमी केल्याचेही उदाहरण नाही. यावर सगळेच अधिकारी किंवा कर्मचारी भ्रष्ट नसतात, अनेक जण प्रामाणिकपणे आपले काम करतात आणि दरम्यानच्या काळात त्यांच्या उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नसते, त्यामुळे निवृत्तीनंतर त्यांना सन्मानाने जगण्याची तजविज सरकारने करायला हवी, असा तर्क दिला जातो हा तर्क योग्यच आहे. आपले संपूर्ण आयुष्य सरकारी सेवेत व्यतीत केल्यामुळे त्यांच्या उत्तर आयुष्याची काळजी सरकारने घेणे अपेक्षित आहे. निवृत्तीवेतन ही संकल्पना त्याचाच परिपाक आहे; परंतु प्रश्न हा उपस्थित होतो की काम करण्याची शारीरिक क्षमता कमी झाल्यानंतर त्या व्यक्तीच्या उर्वरित आयुष्याची काळजी सरकारने घ्यावी ही अपेक्षा केवळ सरकारी कर्मचाऱ्यांच्या बाबतीतच का? खरे तर सरकारी कर्मचारी हा उत्पादक घटक नाही, म्हणजे देशाच्या उत्पन्नात ते भर घालत नाही, केवळ प्रशासकीय जाळ्याच्या माध्यमातून सरकारच्या योजना व्यवस्थित राबविण्याचे काम ते करीत असतात, हे कामदेखील महत्त्वाचे असले तरी ते उत्पादक नाहीत हे लक्षात घ्यावेच लागेल, याचा अर्थ हा प्रशासकीय यंत्रणेचा डोलारा सांभाळण्यासाठी सरकार जो काही खर्च करीत असते तो पैसा इतर घटकांकडून येतो आणि त्यात शेतकरी हा मुख्य घटक आहे. भारत आजही कृषिप्रधान देश आहे, म्हणजेच आजही भारताचा आर्थिक डोलारा मुख्यत्वे शेती क्षेत्रावर अवलंबून आहे. शेतकरी हा उत्पादक घटक आहे; परंतु त्याच्या नशिबात मात्र कोणतीही आर्थिक सुरक्षा नाही. सरकारी कर्मचारी उर्वरित आयुष्य निवृत्तीवेतनाच्या आधारे कोणतेही काम न करता सहज जगू शकतो. देशवासियांच्या पोटाची भूक भागविणाऱ्या शेतकऱ्यांना निवृत्तीचे वय नसते. जोपर्यंत होईल तोपर्यंत त्याला कष्ट करावेच लागतात आणि कष्ट करण्याची क्षमता संपल्यावर त्याला कुणाच्या तरी आधारे जगावे लागते. त्याला निवृत्तीउपरांत स्वाभिमानाने जगण्याची कोणतीही तरतूद सरकार करीत नाही. हातमजुरी करणारे, कोणताही छोटा-मोठा व्यवसाय करणारे या सगळ्यांची एकत्रित संख्या गृहीत धरली तर ती लोकसंख्येच्या किमान ७० टक्के तरी नक्कीच आहे. हा एवढा मोठा समाजघटक उत्तर आयुष्यातील कोणत्याही आर्थिक सुरक्षेशिवाय जगू शकत असेल तर सेवाकाळात एक निश्चित वेतन म्हणजेच उत्पन्न प्राप्त करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांनी आपल्या उत्तर आयुष्यासाठी सेवाकाळातच तजविज करावी ही अपेक्षा चुकीची कशी म्हणता येईल. रिझर्व्ह बँकेने दिलेल्या माहितीनुसार २०२३-२४ या वर्षात निवृत्तिवेतनापोटी झालेला एकूण खर्च ५ लाख २२ हजार १०५ कोटी रुपयांहून अधिक आहे. हा प्रचंड पैसा दरवर्षी पायाभूत सुविधांसाठी वापरला गेला तर कदाचित या देशात गरीब कुणीच राहणार नाही; परंतु लाडक्यांचे लाड करणाऱ्या सरकारला शेतकरी, कष्टकऱ्यांचे अश्रू दिसत नाही, हेच वास्तव आहे.

# नाथाभाऊंची परवड....!

२०१४ मध्ये राज्यात जेव्हा भाजपचे सरकार स्थापन झाले तेव्हा मुख्यमंत्री पदाचे सर्वाधिक सशक्त दावेदार मानल्या गेलेल्या नाथाभाऊंची भाजपमध्ये तेव्हापासूनच जी परवड सुरू झाली ती अजूनही संपण्याचे नाव घेत नाही. परवा त्यांच्या वाढदिवसानिमित्त झळकलेल्या बॅनरवर शरद पवारांचा फोटो होता, त्यामुळे नाथाभाऊ नेमके कोणत्या पक्षात आहे, हा संभ्रम निर्माण झाला. नाथाभाऊंनी आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा शरद पवार आणि जयंत पाटलांकडे पाठविला होता, आपण आमदारकीचाही राजीनामा दिला होता; परंतु शरद पवारांनी आमदारकी सोडू नका, असे सांगितले आणि पक्षाचा राजीनामाही अजून स्वीकृत झालेला नाही, त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या आपण अजूनही राष्ट्रवादी काँग्रेसमध्येच असल्याचे सांगितले. आपल्याला भाजपमध्ये प्रवेश घ्यायचा होता, त्यासंदर्भात भाजपमधील वरिष्ठ नेत्यांशी बोलणेही झाले, लोकसभा निवडणुकीपूर्वीच आपल्याला भाजपमध्ये परतायचे होते; परंतु अजूनही भाजप नेतृत्वाकडून कोणताही निरोप आलेला नाही, असे नाथाभाऊंनी स्पष्ट केले. नाथाभाऊंसारखा ज्येष्ठ नेता एखाद्या पक्षात प्रवेश करू इच्छितो आणि तो पक्ष त्यांना काही महिने झुलवत ठेवतो, हा प्रकार खूप दुर्दैवी म्हणायला हवा. नाथाभाऊंबद्दल काही लोकांच्या तक्रारी असतील, काही लोकांचा त्यांच्या पक्षप्रवेशावर आक्षेपही असेल; परंतु एक बाब लक्षात घ्यायलाच हवी की राज्यात भाजपला ताकद देण्यात, भाजपला मजबुतीने उभे करण्यात त्यांनी आपली हयात घालविली. ज्या नेत्यांच्या, कार्यकर्त्यांच्या त्यागावर आज भाजप हे वैभवाचे दिवस पाहत आहे त्या नेत्यांपैकी नाथाभाऊ एक आहेत. त्यामुळे त्यांची या वयात अशी परवड होणे कोणत्याही सच्च्या कार्यकर्त्याला वेदना देणारी बाब आहे. त्यांना पक्षात प्रवेश द्यायचा नसेल तर पक्ष नेतृत्वाने तसे स्पष्ट सांगायला हवे आणि त्यांचा पक्षप्रवेश निश्चित झाला असेल तर त्यांना असे झुलवत ठेवू नये. त्यातून केवळ नाथाभाऊंचीच परवड होत नसून भाजपच्या प्रतिष्ठेवर, नीतीवर, नियतीवरही प्रश्नचिन्ह उभे राहत आहे. पक्षासाठी आपले आयुष्य वेचणाऱ्या एका ज्येष्ठ नेत्याला अशी उपेक्षा सहन करावी लागत असेल तर सामान्य कार्यकर्त्यांनी पक्षाकडून कुठली अपेक्षा ठेवायची, हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक ठरतो.

**स्थित्यंतर**

# संघाचा ताप अन् मित्रपक्षांचा मनःस्ताप!



राही भिडे
9867521049

लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाचे खापर संघ परिवार अजित पवार यांच्यावर फोडून मोकळे झाले खरे, पण हा ग्रीन सिग्नल समजून भाजपच्या नेत्यांनी अजितदादांशी युती नको, असे स्थानिक पातळीवर सांगण्यास सुरुवात केली, तर दुसरीकडे शिवसेनेचा शिंदे गट सातत्याने अजितदादांची कोंडी करीत आहे आणि त्यांना महायुतीतून बाहेर पडण्याचा इशारा देत आहेत. अजितदादांनी बाहेर पडून तिसरी आघाडी करून निवडणूक लढवावी, त्याचा फायदा महायुतीला व्हावा, असा तर शिवसेना-भाजपचा डाव नाही ना, अशी शंका निर्माण होते.

लोकसभा निवडणुकीनंतर सत्ताधारी महायुतीतील भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना या तिन्ही पक्षांत सातत्याने वादाची ठिणगी पडत आहे. शिवसेना शिंदे गटाचे मंत्री तानाजी सावंत यांनी तर त्यांच्या मनातील खदखद जाहीरपणे व्यक्त केली. अजित दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेससोबत बसल्याने आम्हाला उलट्या होतात असे विधान करून त्यांनी एकच खळबळ उडवून दिली. त्यावर राष्ट्रवादी काँग्रेसने तीव्र आक्षेप घेतला. तसेच सत्तेतून बाहेर पडण्याचाही इशारा दिला. त्यातच आता भाजपचे प्रदेश प्रवक्ते गणेश हाके यांनी राष्ट्रवादी काँग्रेसशी युती म्हणजे असंगाशी संग असल्याचे विधान केले. आतापर्यंत संयमी भूमिका घेणाऱ्या अजितदादांनाही मग संताप आला. प्रत्युत्तर देताना स्वतः अजित पवारांनी आपल्या कार्यकर्त्यांना जशास तसे प्रत्युत्तर देण्यास फर्मावले. या सततच्या वादामुळे हे तिन्ही सत्ताधारी पक्ष एकमेकांपासून सुटका करून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत का? असा प्रश्न उपस्थित होतो. लोकसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुतीची मोठी हाराकिरी झाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने या पराभवासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेससोबतच्या आघाडीला जबाबदार धरले. त्यानंतर भाजपने डॅमेज कंट्रोल करण्याचा प्रयत्न केला; पण त्यानंतरही भाजप व शिवसेनेच्या काही नेत्यांनी सातत्याने राष्ट्रवादी काँग्रेसवर शरसंधान साधून हा वाद तेवत ठेवण्याचे काम केले. भाजप आणि शिवसेनेच्या शिंदे गटात अधूनमधून वाद होत असला, तरी त्या वादावर पडदा टाकला जातो. समज दिली जाते. अजित पवार यांच्याबाबत मात्र तसे होताना दिसत नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे नेते तथा आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी दोन दिवसांपूर्वी मंत्रिमंडळाच्या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसण्याची वेळ आल्यामुळे आम्हाला अक्षरशः उलट्या होतात असे विधान केले. आम्ही हाडामासाचे शिवसैनिक आहोत. त्यामुळे माझे काँग्रेस व राष्ट्रवादीसोबत केव्हाच जमले नाही. यामुळे कॅबिनेटच्या बैठकीत राष्ट्रवादीच्या मांडीला मांडी लावून बसत असल्यामुळे आम्हाला उलट्या होतात, कारण आम्ही आमच्या तत्वांशी बांधील आहोत, असे ते म्हणाले होते. उघडउघड हा अजितदादा यांच्यावर हल्ला होता. त्याआगोदर रायगड जिल्ह्यातील शिवसेनेच्या शिंदे गटाच्या आमदारांनी अजितदादा आणि त्यांच्या पक्षाला विश्वासघातकी ठरवले होते. दुसरीकडे अजित पवार यांनी त्यांच्या आमदारांच्या कामांच्या पाठवलेल्या फाईल मुख्यमंत्र्यांनी सह्यांसाठी अडवून ठेवल्याची दबक्या आवाजात चर्चा सुरु होती. भाजप आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांचे जसे गूळपीठ जमते, तसे शिंदे गट आणि भाजपच्या कार्यकर्त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांशी जमत नाही. टोकाचे वैचारिक मतभेद आणि परस्परविरोधी भूमिका हे त्याचे कारण आहे.

सावंत यांच्या या विधानानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी अजित पवारांना असे बोलणे ऐकून घेण्यापेक्षा अशा सत्तेवर लाथ मारून बाहेर पडलेले बरे, असा सल्ला दिला. महायुती झाली म्हणूनच सावंत मंत्री झाले अशी मखलाशीही त्यांनी केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनीही या प्रकरणी शिवसेनेला निर्वाणीचा इशारा दिला. महायुतीतील घटकपक्षांकडून होणारी अवहेलना आता सहन होत नाही. सावंत यांच्यासारख्या माणसाला हाफकीन माणूस आहे की संस्था हे कळत नाही. त्याच्याकडून काय अपेक्षा करणार? संबंधितांनी अशा लोकांना आवर घालावा, अन्यथा आमचा संयम सुटेल, असा इशारा मिटकरी यांनी दिला होता. सावंत व राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांमधील वादाची धग संपत नाही, तोच आता भाजपचे प्रदेश प्रवक्ते गणेश हाके यांनी राष्ट्रवादी काँग्रेससोबतची युती म्हणजे असंगाशी संग असल्याचे विधान करून या वादाला नव्याने फोडणी दिली आहे. लोकसभा निवडणुकीत अहमदपूरचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार बाबासाहेब पाटील व त्यांचे कार्यकर्ते प्रचाराला बाहेर पडलेच नाहीत. त्यामुळे भाजपच्या खासदाराला पराभवाची चव चाखावी लागली. त्यामुळे अजित पवारांच्या पक्षाबरोबर झालेली युती अत्यंत दुर्दैवी आहे. खरे म्हणजे ही युती ना त्यांना पटली ना आम्हाला पटली. असंगाशी संग म्हणतात तसा संग आमच्यासोबत घडवण्यात आला, असे हाके यांनी म्हटले आहे. हाके यांच्या या जहरी टीकेनंतर अजित पवार यांच्या संयमाचा बांध सुटला. त्यांनी या मुद्यावर मोजक्या शब्दांत प्रतिक्रिया देत अप्रत्यक्षपणे आपल्या मनातील खदखद बोलून दाखवली. अशी थेट टीका करणाऱ्यांना सोडून देतील ते दादा कसले? मला कुणावरही टीका करायची नाही. अशा बोलण्यामुळे माझ्या अंगाला भोकेही पडत नाहीत; पण खरेच असे कुणी काही बोलले असेल तर माझेही कार्यकर्ते त्याला योग्य ते उत्तर देतील, असा हल्लाबोल त्यांनी केला. एकप्रकारे टीका करणाऱ्या महायुतीतील घटकपक्षांना सडेतोड प्रत्युत्तर देण्याचेच आदेश अजित पवारांनी दिले आहेत. त्यामुळे महायुतीतील वाद एका तार्किक निष्कर्षाला जाईपर्यंत थांबणार नाही, हेच यामधून स्पष्ट होत आहे. पवार यांच्या विधानानंतर काही वेळातच राष्ट्रवादीची मुलूख मैदानी तोफ असणाऱ्या मंत्री छगन भुजबळ यांनी मित्र पक्षांच्या नेत्यांना आपल्या पदाधिकाऱ्यांना वादग्रस्त विधाने करण्यापासून थांबण्याची तंबी दिली. या विधानांशी सर्वांचा संबंध नसला तरी निवडणुकीच्या तोंडावर मने दुखावली जातात. निवडणुकीच्यावेळी आपण एकसंध आहोत, हे लोकांना दाखवावे लागते; पण अशा विधानांमुळे आपल्यातील वादाची मजा विरोधी पक्ष घेतील असे बोधामृत भुजबळांनी पाजले.

बदलापूर येथील एका शाळेत दोन अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण झाल्याची बाब उजेडात आली होती. त्याचे राज्यभर तीव्र पडसाद उमटले होते. या प्रकरणी सरकारला चौफेर टीका सहन करावी लागली. या घटनेचे वादळ शमते न शमते तोच मालवणच्या राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळण्याची घटना घडली. यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारची चांगलीच कोंडी झाली आहे. विशेषतः यामुळे सरकारने राबवलेल्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनाही झाकोळली गेली. महायुतीतील वादावादीमुळे सरकारची प्रतिमाही मोठ्या प्रमाणात मलिन होत आहे. या पार्श्वभूमीवर सत्ताधारी महायुतीच्या घटकपक्षांत एकमेकांना पाण्यात पाहण्याचा हा वाद उफाळून आला आहे. राज्यात विधानसभेची निवडणूक अवघ्या दोन महिन्यांवर येऊन ठेपली आहे, असे असताना महायुतीत मिठाचा खडा पडला आहे. त्याआगोदर पुण्यातील भाजपच्या तीन पदाधिकाऱ्यांनी अजित पवार सोबत नको, अशी जाहीर भूमिका घेतली. वाद महायुती तुटण्यापर्यंत जात असल्याने शिवसेनेच्या शिंदे गटाचे प्रतोद भरत गोगावले यांनी सावरून घेण्याचा प्रयत्न केला. आरोग्यमंत्र्यांना उलट्या येत असतील तर ते स्वतः आरोग्य मंत्री आहेत त्यांनी त्याचे औषध घ्यावे. चुकीचे वक्तव्य करू नये. त्यांना जमत नसेल तर त्यांनी गप्प बसावे. याबाबत आम्ही मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करू, अशा शब्दांत गोगावले यांनी सावंत यांना घरचा आहेर दिला. अजित दादांची डोकेदुखी वाढली असल्याने तिसरी आघाडी अस्तित्वात येईल का, याबाबत राजकीय वर्तुळात उलट सुलट चर्चा होत आहे.

**सरळ-सरळ**

# शिक्षकांना फक्त विद्यार्थ्यांना शिकवू द्यावे...



राजेश राजोरे
9822593903

शाळेतील मुख्याध्यापकाला प्रचंड ऑनलाईन कामे करावे लागतात. इतर शिक्षकांनाही बी.एल.ओ. सारखी कामे लावलेली आहेत. वेगवेगळ्या मीटिंग, व्ही.सी., लोकसहभागातून भौतिक सुविधा निर्माण करणे, लोकसहभाग मिळवण्यासाठी दारोदार फिरणे, वेगवेगळी सर्वेक्षण करणे, माहित्यांच्या लिंक भरणे, विविध स्पर्धांची तयारी करून घेणे, वेगवेगळे उत्सव, उपक्रम राबवणे यातच शिक्षकांचा वेळ जाताना दिसत आहे.

**जीने की कला सिखाते शिक्षक,**
**ज्ञान की कीमत बताते शिक्षक,**
**पुस्तकों के होने से कुछ नही होता,**
**अगर मेहनत से नहीं पढाते शिक्षक।**

परवा ५ सप्टेंबर शिक्षक दिन. शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांच्या विशेष योगदानाबद्दल किंवा समुदायामध्ये त्यांचा सन्मान करण्यासाठी हा दिवस भारतात साजरा केला जातो. शिक्षक दिन साजरा करण्याची कल्पना १९ व्या शतकात अनेक देशांमध्ये रुजली. वेगवेगळे देश हा दिवस वेगवेगळ्या तारखांना साजरा करतात. भारतात दुसरे राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस ५ सप्टेंबर १८८८ हा १९६२ पासून शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो.

शिकविणाऱ्याला शिक्षक (टीचर) म्हणतात. शिष्याच्या मनात शिकण्याची इच्छा जागृत करु शकणारेच खरे शिक्षक म्हणता येईल. तर मुलांचा पहिला 'रोल मॉडेल' शिक्षक असतो. शिक्षक शिकविण्याचे काम करणारी अशी व्यक्ती असते, जी शिकणे आणि शिकविणे ही प्रक्रिया कौशल्याने सुलभ करते. तेव्हा शिक्षक पात्र असणे, त्याने त्याचे काम पूर्ण कौशल्याने, परिश्रमपूर्वक, आणि परिणामकारकतेने करणे आवश्यक आहे. शिक्षकाला 'गुरू' म्हणूनही संबोधिले जाते. वास्तविक पाहता 'गुरू' या शब्दाचा शाब्दिक अर्थ, संपूर्ण म्हणजेच जीवनाची परिपूर्णता प्राप्त करण्याच्या दृष्टीने वाटचाल करण्यासाठी आपला मार्ग प्रकाशित करणारा, असा होतो. आणि असेच कार्य शिक्षक करतात. म्हणूनच 'आम्ही विद्यार्थ्यांचे भविष्य घडवीत नाही, तर भविष्यासाठी विद्यार्थी घडवितो,' असे सुत्र शिक्षक व शिक्षणसंस्थासाठी महत्त्वाचे ठरते.

आजचे शिक्षक खूप बदलले, पूर्वीसारखे राहिले नाही, आदरयुक्त भीती विद्यार्थ्यांमध्ये आढळत नाही, शिक्षक शिकविण्याचे मुख्यकाम सोडून इतर कामे करतात, वगैरे खूप आरोप व तक्रारी आहेत. मात्र यासाठी प्रामुख्याने व्यवस्था जबाबदार आहे. शासनाचे उपक्रम उदंड झाले असून ते राबविण्याचे काम शिक्षकांकडून केल्या जाते. यामध्येच शिक्षकांचा वेळ जातो, विद्यार्थी व शिक्षकांच्या भेटी कमी झाल्या आहेत. दरम्यान शिक्षकांना फक्त विद्यार्थ्यांना शिकवू द्यावे, अशी मागणी होत आहे.

दुसरीकडे 'उपक्रमांचा महापूर; शिक्षण चाललंय वाहून दूर' असे म्हणण्याची वेळ राज्यातील प्राथमिक शिक्षकांवर आली आहे, असे सांगतांना शिक्षक जी माहिती देत आहेत, ती चिंतनीय आहे. प्रत्यक्षात शाळा १५ जूनपासून सुरू होत असते परंतु शाळा सुरू होण्याची लगबग एक जून पासूनच सुरू होते. यावर्षी १ जूनपासून विविध उपक्रम, अभियान, उत्सव, महोत्सव, सप्ताह, वेगवेगळया योजनांच्या माहित्या, यासंदर्भात सुमारे २२१ पत्रे, ऑनलाइन लिंक्स मुख्याध्यापकाच्या मोबाईलला शिक्षण विभागाकडून पाठवण्यात आल्या आहेत. या सर्व लिंक भरणे त्याची माहिती ऑफलाईन शिक्षण विभागात देणे, वेगवेगळे उपक्रम राबविणे, त्याचे फोटो काढणे, ते फोटो शासनाच्या वेबसाईटवर अपलोड करणे, त्यासंबंधीचे अहवाल तयार करून शाळेत जतन करणे अशा कामात शिक्षक सध्या गुंतलेले दिसत आहेत. आधीच सुमारे १५० प्रकारची रजिस्टर लिहून शिक्षक जतन करीत असताना त्यात यावर्षी आजपर्यंत आणखी २२१ प्रकारच्या माहित्यांची भर पडली आहे.

शाळेतील मुख्याध्यापकाला प्रचंड ऑनलाईन कामे करावे लागतात. इतर शिक्षकांनाही बी.एल.ओ सारखी कामे लावलेली आहेत. वेगवेगळया मीटिंग, व्ही.सी., लोकसहभागातून भौतिक सुविधा निर्माण करणे, लोकसहभाग मिळवण्यासाठी दारोदार फिरणे, वेगवेगळी सर्वेक्षण करणे, माहित्यांच्या लिंक भरणे, विविध स्पर्धांची तयारी करून घेणे, वेगवेगळे उत्सव, उपक्रम राबवणे यातच शिक्षकांचा वेळ जाताना दिसत आहे. लाडकी बहीण योजनेसाठी जुने दाखले शोधताना व देताना मुख्याध्यापकांच्या नाकीनऊ येतात. शिक्षकांना वर्गात जायलाही वेळ मिळत नाही. त्यामुळे शिक्षक विद्यार्थ्यांना, विद्यार्थी शिक्षणाला पोरका झाला. एकीकडे अशैक्षणिक कामे दुसरीकडे शिक्षकांच्या अनेक जागा रिक्त आहेत. वर्षानुवर्ष शिक्षकांची भरती नसल्यामुळे डी.एड.कॉलेज ओस पडले आहेत.

प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा वयोगटच तंबाखू खाण्याचा नाही, त्या प्राथमिक शाळांमध्ये तंबाखू विरोधी व अमली पदार्थ विरोधी अभियान राबवण्याचा आदेश दिला जातो. मात्र ज्या वयोगटात तंबाखू, गुटखा, मावा खाल्ला जातो त्या कॉलेजमधील विद्यार्थ्यांकरिता कॉलेजमध्ये हे अभियान चालत नाही व राबवण्याची सक्तीही केली जात नाही. असो.

शेवटी उपक्रमांना राबविण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था व यंत्रणा असावी तर शिक्षकांनी उपक्रम राबविण्यासाठी विरोध करीत विद्यार्थ्यांना शिकविण्याचे, घडविण्याचे, नवीन पीढी निर्माण करण्याच्या कार्यात सदा अग्रेसर रहावे, या आशयाचा एक शेर आठवतो...

**उलझनों से डरे नही**
**कोशिश करें बेहिसाब**
**इसी का नाम है जिंदगी**
**चलते रहिए जनाब...**

(लेखक हे दैनिक देशोन्नतीच्या बुलडाणा आवृत्तीचे संपादक आहेत.)
खामगाव, जि. बुलडाणा

**वास्तव**

# विद्यार्थ्यांच्या चिंताजनक आत्महत्या!



श्याम ठाणेदार
9922546295

भारतातील विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्यांबाबत एक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला. मागील आठवड्यात नॅशनल क्राईम ब्युरोच्या डेटावर आधारित 'स्टुडंट्स सुसाईडः अन् अपेडेमिक स्वीपिंग इंडिया' नावाचा अहवाल वार्षिक आयसी ३ परिषद आणि आणि एक्स्पो २०२४ मध्ये जाहीर करण्यात आला. या अहवालानुसार देशातील आत्महत्यांच्या दरात कमालीची वाढ झाली आहे. यावर्षी देशभरात ७० हजारांहून अधिक नागरिकांनी आत्महत्या केल्या असून यात सर्वात जास्त आत्महत्या पुरोगामी महाराष्ट्रात झाल्या आहेत. त्यातही धक्कादायक आणि चिंताजनक बाब म्हणजे यात सर्वाधिक आत्महत्या विद्यार्थ्यांच्या आहेत. त्यातही पुरोगामी महाराष्ट्राचा पहिला क्रमांक लागतो. महाराष्ट्रात सर्वाधिक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. महाराष्ट्रानंतर तामिळनाडू, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, झारखंड या राज्याचा क्रमांक लागतो. विद्यार्थी आत्महत्येत महाराष्ट्र अव्वल क्रमांकावर असणे ही भूषणावह बाब नसून शिव, फुले, शाहू, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्राला खाली मान घालायला लावणारी ही बाब आहे. ठकणखर देशा, राकट देशा, दगडांच्या देशा' असा महाराष्ट्राचा उल्लेख होतो, त्यात दुर्दैवाने आत्महत्यांच्या देशा, असेही नमूद करावे लागत आहे. आज जगातील सर्वाधिक लोकसंख्या भारतात आहे आणि यात सर्वात जास्त तरुणांची संख्या आहे. भारतात तरुणांची संख्या जवळपास ६० टक्के इतकी आहे. इतके तरुण जगातील कोणत्याच देशात नाहीत म्हणूनच भारताकडे आगामी महासत्ता म्हणून पहिले जाते. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्वास होता. तरुणांच्या जोरावरच भारत जागतिक महासत्ता बनेल असा विश्वास त्यांना होता. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता बनण्याची स्वप्ने पाहत आहोत तोच तरुण जर असा अकाली मृत्यूला कवटाळू लागला तर देशाच्या भविष्यावरच प्रश्न चिन्ह निर्माण होऊ शकते. म्हणूनच विद्यार्थ्यांच्या या आत्महत्या राज्यकर्त्यांनी गांभीर्याने घ्याव्यात आणि आत्महत्या कमी रोखण्यासाठी ठोस धोरण आखायला हवे. अर्थात विद्यार्थी आत्महत्या का करतात याचाही विचार व्हायला हवा. विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्यांमागे अनेक करणे आहेत त्यातील प्रमुख कारण म्हणजे पालकांच्या मुलांकडून अनाठायी अपेक्षा. शिक्षणातील भयंकर स्पर्धा, गुणांची जीवघेणी चढाओढ, शिक्षण घेऊनही रोजगार न मिळणे, प्रेमभंग या आणि अशा अनेक कारणांमुळे तरुण अकाली मृत्यूला कवटाळीत आहेत. समाज माध्यमांचा वाढता प्रभाव हेदेखील विद्यार्थी आत्महत्यांच्या कारणांपैकी महत्त्वाचे कारण आहे. समाज माध्यमांच्या आहारी गेल्यामुळे मुले खूप भावनिक झाली आहे. आपल्या भावनांना आवर न घालता आल्याने मुले आत्महत्येचा मार्ग स्वीकारीत आहेत. ब्लू व्हेल, पोकोमन यासारख्या हिंसक गेम्समुळेदेखील अनेक मुलांनी आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. विद्यार्थ्यांना पालकांकडून हल्ली अनेक गोष्टी सहज उपलब्ध होऊ लागल्या आहेत त्यामुळे एखादी गोष्ट जेव्हा मिळत नाही तेव्हा ती मिळावी यासाठी विद्यार्थी अट्टाहास करतात मग त्यांना त्यात अपयश आले की ते मृत्यूला कवटाळतात म्हणून पालकांनी मुलांना नकार पचवायला शिकवले पाहिजे. पालकांनी मुलांवर अपेक्षांचे ओझेही लादू नये.

विद्यार्थी आत्महत्या म्हणजे देशाची मोठी हानी त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्याची जबाबदारी केवळ पालकांचीच आहे असे नाही तर शाळा, कॉलेज, शिक्षक, समाज आणि शासनाचीही आहे. या सर्व घटकांनी एकत्र येऊन विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

**वाचक विचार मंच**

## शेतकऱ्यांच्या कृषी उत्पन्नाला हमी भाव कधी?

आपला देश कृषिप्रधान म्हणून जगामध्ये ओळखला जातो. येथील ७० टक्के लोक शेती उद्योग करतात. देश स्वतंत्र झाल्यापासून शेतकरी आपली आर्थिक स्थिती सुधारु शकला नाही, कारण शेतकऱ्यांच्या कृषी उत्पन्नाला योग्य भाव मिळत नाही. आपल्या देशातील पूर्णपणे शेती निसर्गावर अवलंबून आहे, त्यामुळे सध्या अवेळी पडणाऱ्या पावसामुळे आलटून-पालटून पिके घेणे शेतकऱ्याला अवघड झाले आहे. अनेक संकटांना सामोरे जाऊन आपला शेतीव्यवसाय करावा लागतो. मुख्यत्त्वे आपला देश कृषिप्रधान असल्याने प्रामुख्याने याकडे सरकारने लक्ष देणे क्रमप्राप्त ठरते. मात्र, तसे होताना दिसत नाही.

देशांतील शेतकऱ्यानी रात्रंदिवस काबाडकष्ट करून पिकवलेल्या पिकांना योग्य भाव मिळत नसल्याने अनेक शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी काढलेले कर्ज भरता येत नसल्याने त्यांच्यावर आत्महत्येशिवाय दुसरा पर्याय उरत नाही हे वास्तव नाकारता येत नाही.

. संपूर्ण जगाला अन्नधान्य पुरवठा करणारा आपला शेतकरी, जगाचा पोशिंदा तोच जर कोलमडला तर देशाची स्थिती बदलेल त्यासाठी भारत सरकारने शेतकऱ्यांच्या शेती मालाला योग्य हमी भाव देण्यासाठी ठोस निर्णय घेणे गरजेचे बनले आहे.

**राजू जाधव,**
मांगूर, जि. बेळगांव

## आता ओटीपी होणार कालबाह्य

भारतात ऑनलाइन पेमेंट करण्याची पद्धत खूपच लोकप्रिय झाली असून भारतातल्या ग्रामीण भागातही सर्वसामान्य झाली आहे. ऑनलाइन व्यवहार करतानाची 'वन टाइम पासवर्ड' अर्थात 'ओटीपी' पद्धतही सर्वांना माहीत झाली आहे; परंतु ऑनलाइन व्यवहार जसजसे वाढत गेले तसतसे सायबर चोरांकडून ओटीपी हॅक करून ग्राहकांना टोपी लावण्याचे प्रकार वाढत गेले. गेल्या दोन वर्षांत फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये तब्बल ३०० टक्के इतकी वाढ झाली आहे. अशा परिस्थितीत ऑनलाइन व्यवहार, फसवणूक आणि घोटाळ्यांपासून अधिक सुरक्षित होण्यासाठी पारंपरिक पासवर्ड आणि ओटीपी बदलून त्याऐवजी फिंगरप्रिंट्स (बोटांचे ठसे) किंवा चेहऱ्यांचे स्कॅन अशा बायोमेट्रिक प्रमाणीकरण पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. भारतात पहिल्यांदाच सुरू होणारी ही पद्धत नंतर जगभरात सुरू करण्यात येणार आहे.

**प्रदीप शंकर मोरे**, मो.नं.: ९८७०७७७२७४

**योजनांचा महापूर** धुम्म

नव नव्या योजनांची
नव नवी ताण
नवे सुर ऐकण्यासाठी
उघडे ठेवा कान

घोषणांचे गाणे
आश्वासनांचे आलाप
सर्वपक्षीय गायकांचा
राजकीय फडावर मिलाप

उद्या होईल भैरवी
जी आज वाटते भुपाळी
निवडणूक होताच
निराशा येईल कपाळी

संगीतातला राग
मग मनात उसळेल
आशा अपेक्षांची ताण
हवेतच मिसळेल.


**ॲड. अनंत खेळकर**
अकोला

**संवाद**

# भारतातील जुन्या धरणांचे स्ट्रक्चरल ऑडिट नियमितपणे होण्याची आवश्यकता!

जगातील इन्स्टिट्यूट फॉर वॉटर एन्व्हायरयरमेंट अँड हेल्थ या संस्थेच्या अहवालानुसार जगात अमेरिका व चीन खालोखाल भारतात धरणे आहेत. भारतात एकूण धरणाची संख्या ४४०७ एवढी आहे. विशेष म्हणजे २०२५ पर्यंत पन्नास वर्षे पूर्ण झालेल्या धरणाची संख्या १११५ एवढी होणार आहे.

विशेष म्हणजे धामापूर हे ठिकाण महाराष्ट्रात असून तेथे ४२४ वर्षापूर्वीचे धरण आहे. अतिपावसामुळे या धरणावरील दबाव वाढत आहे. पावसाचे प्रमाण व तीव्रता वाढत असल्यामुळे जुन्या धरणांचा सुरक्षिततेचा मुद्दा नव्यानेच पुढे आला आहे. वातावरणातील बदलामुळे साहजिकच या धरणाचे आयुष्य कमी होत आहे. हिमाचल प्रदेशात एक ऑगस्ट रोजी जोरात झालेल्या ढगफुटीमुळे मलाना जलविद्युत प्रकल्पाचे धरण फुटून त्यात पाचजण मरण पावले तर सुमारे ५०जण बेपत्ता झाले. हिमालयाचा परिसर हा




अस्थिर असल्यामुळे तेथे नवीन धरणे बांधू नयेत अशी मागणी हिमालय नीती अभियान या संस्थेने केलेली आहे. देशातील जुन्या धरणाचा विचार केल्यास शंभर वर्षापेक्षा जास्त वय असलेली धरणे २३४ एवढी आहेत. त्यात महाराष्ट्रातील धरणांची संख्या ४४ एवढी आहे. बदलत्या हवामानामुळे एकदम मोठ्या प्रमाणात पाऊस पडत आहे. अलीकडे अशा घटनांची वाढ मोठ्या प्रमाणात झाली आहे. देशाच्या ७० टक्के जिल्ह्यात पावसाचे प्रमाण व त्याची तीव्रता वाढली आहे. ही जुन्या धरणांची समस्या भारतात आहे, असे नाही तर अमेरिकेमध्येसुद्धा आहे. धरणे जुनी होत गेल्यावर त्यांच्यातील गळती वाढून साठवण क्षमता कमी होते त्यांच्या भिंती व दरवाजांची तूटफूट होते. अमेरिकेत ९१ हजारापेक्षा जास्त धरणे आहेत. विशेष म्हणजे २०२३ पर्यंत ७० टक्के धरणांचे आयुष्य ५० वर्षाचे होईल. तेथे दर चार वर्षांनी स्ट्रक्चरल ऑडिट केले जाते. भारतातही जुन्या धरणांचे स्ट्रक्चरल ऑडिट नियमितपणे होण्याची नितांत गरज आहे. त्यातील अहवालाच्या आधारे सरकारने योग्य ती कारवाई व दक्षता घेण्याची जरुरी आहे.

**शांताराम वाघ**
पुणे, मो.नं.: :+९१ ९६२३४ ५२५ ५३
E mail:
swagh30948@gmail.com

**गुल्लेर**

# अचाट आहेत मच्छर...!



नरेंद्र इंगळे
9561226572

'त्यारोजी काय सोडलं रे मनोहर या डोबीत?'

'गप्पी मासे सोडले.'

'कायच्यासाठी सोडले?'

'मच्छर लय झाले गावात.. ते आरोग्य विभागाचे कर्मचारी आले होते.. त्याहिनं गावातल्या सगळ्या गटारीत मासे सोडले.'

'मंग काय फरक झाला? मच्छर मेले काय?'

'गोटा मारुन पाहा पान्यात.'

'कारे बावा.. एक गोटा मारल्यावर शंभर मच्छर उठले.. याचा अर्थ मच्छर मेलेच नाहीत.'

'मंग मासोया कुठी गेल्या?'

'हे मच्छर त्या मासोयालेच डसले. मासोया मलेरिया होऊन मेल्या.'

'हे एक मासोई जिती हाय.'

'मच्छर तिच्या हाती सापडत नाही. पान्यावर उडते. मासोईले पान्याच्या बाहीर निंगता येत नाही.'

'हे मासोई मच्छराचे आंडे खाते म्हनतात.'

'मच्छर चतरे आहेत. पान्यात आंडे देत नाहीत. या गाऱ्यात आंडे देतात.'

'बुरी गोठ झाली लेका!'

'मच्छर अचाट आहेत आपल्या गावचे.. कायलेच मरत नाहीत.'

'धुपटानं मरत नाहीत काय?'

'अरे त्या धुपटाच्या मशीनचा मोठा आवाज येते. आवाज आला की मच्छरं कोपऱ्यात जाऊन लपतात. धुपट गेलं की अदीक बाहीर येतात..'

'लयच हुशार आहेत लेकाचे.'

'गेल्या वर्षी धुपट केलं होतं.. साऱ्या गावात मशीन फिरवली. तिच्या आवाजानं मच्छर आखरात जाऊन लपले होते.'

'दिवसभर काय करतात लेकाचे मच्छर?'

'त्याहिले एकच धंदा आहे.. लोकसंख्या वाढवा! भारताची लोकसंख्या जगात एक नंबर झाली म्हनतात.. मंग मच्छरच कायले मागं राह्यतीन?'

'या मच्छराचा बंदोबस्त करा बरं.. लय तरास हाय राजेहो.'

'आता काय मच्छराची नसबंदी कराले लावता? कुत्र्याची नसबंदी सक्सेस झाली नाही. रिकामे पैसे गमावले.. मच्छराची सक्सेस होईन काय?'

# माढा तालुक्यातील मोडनिंब बाजारात उडदाला मिळाला सर्वोच्च भाव



वृत्तसंस्था

**मोडनिंब / सोलापूरः** माढा तालुक्यातील मोडनिंब बाजारात उडदाची आवक वाढली आहे. प्रतिक्विंटल दर ८,२५० रुपये मिळत असल्याने शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे.

मोडनिंब येथील कृषी उत्पन्न उपबाजार समितीच्या आडत बाजारमध्ये १६०० पिशव्यांची आवक झाली होती.

माढा तालुक्यातील मोडनिब, अरण, जाधववाडी, बैरागवाडी, तुळसी, भेंड भागातून, मोहोळ तालुक्यातील शेटफळ, तेलंगवाडी, खंडाळी, सिद्धेवाडी, पंढरपूर तालुक्यातील बार्डी, करकब, जाधववाडी, रोपळे या भागातून शेतकऱ्याचा माल मोडनिंबला येत आहे.

सध्या दर ही स्थिर असल्यामुळे शेतकरी वर्गामधून उत्साही वातावरण दिसत आहे. याबाबत कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पोपटलाल दोभाडा यांनी सांगितले की यंदाच्या वर्षी पाऊस वेळेवर झाल्यामुळे उत्पादनात मोठी वाढ झाली असली तरी दर स्थिर आहेत.

येणाऱ्या काळात पाऊस थांबल्यानंतर बाजारात आणखी आवक वाढेल. त्यामुळे व्यापाऱ्यांसह शेतकरी आनंदात आहेत.

# पंतप्रधान मोदींकडून कोल्हापूरच्या युवकाचे कौतुक

## मराठीतून साधला संवाद

**कोल्हापूर :** पालघर येथील वाढवण बंदराच्या पायाभरणी कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोल्हापूरच्या आदित्य राजेंद्र खैरमोडे या युवकाचे कौतुक केले. खैरमोडे याने सादर केलेल्या प्रात्यक्षिकांचे कौतुक करीत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी 'तुम रोजगार लेनेवाले नही, देनेवाले बनो,' अशा शब्दांत त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली. त्यानंतर त्याच्यासोबत मराठी भाषेतून संवाद साधला.



मोदी यांनी खैरमोडेंसी तुम्ही कोल्हापुरातून आलात काय, अशी मराठी भाषेतून संभाषणाला सुरुवात केली. त्यांनी पाणी पुनः वापर, मत्स्यपालन प्रणालीची माहिती त्यांच्याकडून घेतली. महाराष्ट्रातील मत्स्यविकास विभागाने प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेंतर्गत निवडलेल्या कोल्हापूर, विरार, लातूर, नांदेड येथी लाभार्थ्यांची संवाद साधला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार उपस्थित होते. उपमुख्यमंत्री पवार यांनीही आदित्य खैरमोडे यांचा भाषणात विशेष उल्लेख करीत त्याच्या व्यवसायाची माहिती सांगितली. आदित्य हा कोल्हापुरातील जवाहरनगरातील असून, त्याने बी.एस्सी नंतर मत्स्य व्यवसायात झोकून दिले. त्याने गारगोटी परिसरातील पाल येथे प्रकल्प उभारला. त्यासाठी त्याचे वडील राजेंद्र खैरमोडे यांचे प्रोत्साहन लाभल्याचे सांगितले. दरम्यान, आदित्य यांनी हा प्रकल्प दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना जादा उत्पन्न मिळवून देणारा असल्याचे सांगून टँकमधील मत्स्य शेतीची माहिती दिली.



## दोन्ही राज्यातील सहा जिल्ह्यांना रेलसेवेने जोडणार

## मार्ग २०२८-२९ पर्यंत होणार पूर्ण

# मुंबई-इंदूर नवीन रेल्वे प्रकल्प मंजूर

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्लीः** मुंबई आणि इंदूर या दोन प्रमुख व्यावसायिक केंद्रांना जोडणाऱ्या ३०९ किलोमीटर लांबीच्या नव्या रेल्वे मार्ग प्रकल्पाला केंद्रीय मंत्रिमंडळाने आज मंजुरी दिली. या प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील दोन आणि मध्य प्रदेशातील चार जिल्ह्यांना रेलसेवेने जोडले जाईल, ज्यामुळे या भागातील व्यापार वाढेल. या प्रकल्पाचा एकूण खर्च १८,०३६ कोटी असून, तो वर्ष २०२८-२९ पर्यंत पूर्ण होईल.

हा प्रकल्प मल्टी-मोडल कनेक्टिव्हिटीसाठी पीएम-गती शक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅनची फलश्रृती असून, जे एकात्मिक नियोजनाद्वारे शक्य झाले आहे तसेच या प्रकल्पाद्वारे नागरिकांना, वस्तू आणि सेवांच्या वाहतुकीसाठी अखंड कनेक्टिव्हिटी प्रदान करेल.

महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश या दोन राज्यांमधील या प्रकल्पाअंतर्गत सहा जिल्ह्यांचा समावेश असेल आणि भारतीय रेल्वेच्या सध्याच्या जाळयामध्ये सुमारे ३०९ किलोमीटरची भरही पडेल. या प्रकल्पामुळे ३० नवीन स्थानके बांधली जातील. नवीन रेल्वे मार्ग प्रकल्पामुळे सुमारे १,००० गावे आणि सुमारे ३० लाख लोकसंख्येला जोडली जाऊ शकतील.

या प्रकल्पामुळे देशाच्या पश्चिम/नैऋत्य भागाला मध्य भारताशी जोडणारा एक लहान मार्ग उपलब्ध करून देऊन या प्रदेशातील पर्यटनालाही चालना मिळेल. या नव्या रेल्वे मार्गामुळे महाराष्ट्रातील आणि मध्य प्रदेशातील पर्यटक विविध पर्यटन व धार्मिक स्थळांना सहजरित्या भेट देऊ शकतील, ज्यामुळे या प्रदेशातील पर्यटन क्षेत्रात लक्षणीय वाढ होईल.

या प्रकल्पामुळे पीथमपूर ऑटो क्लस्टरला (९० मोठे कारखाने आणि ७०० लघू आणि मध्यम उद्योग) जेएनपीएच्या गेटवे बंदराला आणि इतर राज्य बंदरांना थेट जोडणी होऊ शकेल. मध्य प्रदेशातील बाजरी उत्पादक जिल्हे आणि महाराष्ट्रातील कांदा उत्पादक जिल्ह्यांना थेट संपर्क प्रदान करू शकतील, तसेच देशाच्या उत्तर आणि दक्षिण भागात त्याचे वितरण सुलभ होईल.

कृषी उत्पादने, खते, कंटेनर, लोह खनिज, पोलाद, सिमेंट, पीओएल इत्यादी वस्तूंच्या वाहतुकीसाठी हा एक आवश्यक मार्ग आहे. क्षमता वाढीच्या कामामुळे सुमारे २६ एमटीपीए (वार्षिक दशलक्ष टन) अतिरिक्त मालवाहतूक होईल रेल्वे हे पर्यावरण स्नेही आणि ऊर्जा कार्यक्षम वाहतुकीचे साधन आहे.

# रामराजे निंबाळकर यांचे महायुतीतून बाहेर पडण्याचे संकेत

## अजित पवारांना पुन्हा धक्का?



**सातारा :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील मतभेद चव्हाट्यावर आले आहेत. त्यातच अजित पवार गटाचे आमदार रामराजे निंबाळकर यांनी नाराजी व्यक्त करत महायुतीतून बाहेर पडण्याचे संकेत दिलेत.

रणजितसिंह निंबाळकर आणि जयकुमार गोरे यांच्यासोबतच्या संघर्षातून रामराजे निंबाळकर यांनी हे विधान केले आहे.

भाजपाचे माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर आणि जयकुमार गोरे यांच्याविरोधातील तक्रारीची भाजपाने दखल घ्यावी अशी मागणी रामराजेंनी केली आहे. साताऱ्यात कार्यकर्त्यांसमोर रामराजे निंबाळकर बोलत होते.

त्यावेळी ते म्हणाले की, आपली काय भारतीय जनता पार्टीसोबत भांडणे आहेत का? तर नाही, आपण हिंदुत्व मुसलमान करतो का?, आपण गाई कापतो त्याला प्रोटेक्शन देतो का? आपली फक्त तक्रार रणजिंतसिंह नाईक निंबाळकर आणि त्यांचे सहकारी हे गल्लोगल्ली दहशत करतात. त्यांच्या दहशतीला आमचा विरोध आहे. त्याला भाजपाने साथ देऊ नये एवढीच खरी आपली तक्रार आहे असे त्यांनी सांगितले.

तसेच याबाबत वरिष्ठांना सांगून बघू, तुम्ही तयारीने या. महिलांना येऊद्या. आपण एक तास वेगळा कार्यक्रम घेऊ आणि विषय संपवून टाकू, जरी उद्या काही फरक झाला नाही तर आपल्याला तुतारी वाजवायला किती वेळ लागतोय. आता अजून काय बोलायचे राहिले का? असे सांगत रामराजे नाईक निंबाळकरांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीची तुतारी हाती घेण्याचेही संकेत दिले आहेत. त्यामुळे रामराजे निंबाळकर हे सध्या समरजितसिंह घाटगे, हर्षवर्धन पाटील यांच्या रांगेत आहेत का, असा प्रश्न यामुळे निर्माण झाला आहे.



# हिंदुस्थानातील लघु उद्योगांवरही चीनचे अतिक्रमण

## जीटीआरआयचा अहवाल

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली :** चीनच्या सीमेवरील कुरघोड्या, घुसखोरी याबद्दल विरोधाचे शाब्दीक बुडबुडे सोडण्यासही कचरणाऱ्या केंद्र सरकार आणि भाजपच्या कचखाऊ वृत्तीमुळे चीनने हिंदुस्थानातील स्थानिक छोटे व्यावसायिक आणि उत्पादकांनाही देशोधडीला लावले आहे. छत्र्या, खेळणी, विशिष्ट प्रकारचे कापड आणि संगीत वाद्ये यांसारख्या वस्तूंची चीनमधून होणारी वाढती आयात रोखण्यासाठी काहीही पावले न उचलणाऱ्या निष्क्रिय केंद्र सरकारमुळे हीच उत्पादने बनवणाऱ्या स्थानिक लघु आणि मध्यम व्यावसायिक रस्त्यावर आले आहेत.

हिंदुस्थान आणि चीन यांच्यातील आयात-निर्यात यातील तफावत प्रचंड असून हा एकूण व्यवहार हिंदुस्थानसाठी आतबट्ट्याचाच ठरला असल्याचे ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्ह (जीटीआरआय) या उद्योग क्षेत्राशी संबंधित थिंक टँकने म्हटले आहे.

# लाच न दिल्याने नर्सने प्रसूती करण्यास दिला नकार

## महिलेची बाथरुममध्ये प्रसूती होऊन नवजाताचा मृत्यू

**ईशानगर(मध्य प्रदेश) :** मध्य प्रदेशात माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली आहे. लाच न दिल्याने परिचारिकेने एका गर्भवतीची प्रसूती करण्यास नकार दिला. तिच्या या लाचारीपणामुळे महिलेने बाथरुममध्येच मुलीला जन्म दिल्याने जमिनीवर पडून नवजाताचा मृत्यू झाला. या घटनेने परिसरात एकच संताप पसरला आहे.

मध्य प्रदेशात भ्रष्टाचाराची प्रकरणे सातत्याने वाढत आहे. लाच घेण्याचे प्रमाणही वाढले आहे. ही घटना ईशानगर येथील आहे. एक आदिवासी कुटुंब गर्भवती महिलेला प्रसूतीसाठी ईशानगर आरोग्य केंद्रात घेऊन गेले होते. त्यावेळी आरोग्य केंद्रात ड्युटीवर असलेली परिचारिका प्रीति प्रजापतीने महिलेच्या कुटुंबियांकडे २ हजार रुपयांची लाच मागितली. मात्र महिलेच्या कुटुंबाची परिस्थिती नसल्याने त्यांनी पैसे देण्यास नकार दिला. त्यावर परिचारिका संतापली आणि तिने प्रसूती कळांनी विव्हळत असलेल्या महिलेची प्रसूती करण्यास नकार दिला. त्यानंतर वेदनेने कळवळत असलेल्या महिलेने बाथरुममध्येच बाळाला जन्म दिला आणि नवजात बाळ जमिनीवर पडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. नवजाताच्या मृत्यूनंतर कुटुंबियांनी परिचारिकेविरोधात तक्रार दाखल केली आहे. परिचारिकेने कर्तव्य बजावताना गर्भवती महिलेला मदत केली असती तर कदाचित या परिस्थितीत तिच्या मुलीला आपला जीव गमवावा लागला नसता, असेही सांगितले. लाचखोरीमुळे नवजात मुलीचा मृत्यू झाल्याची तक्रार कुटुंबीयांनी ईशानगर पोलिस ठाण्यात दिली. या प्रकरणी आता त्या परिचारिकेचे निलंबन करण्यात आले आहे.

ही घटना उघडकीस आल्यानंतर आरोग्य विभागानेही तत्काळ कारवाई करत परिचारिका प्रीती प्रजापती यांना तत्काळ निलंबित केले. आरोग्य विभागाचे प्रादेशिक संचालक यांनी निलंबनाची कारवाई केली आहे. याशिवाय ड्युटीवर असलेल्या डॉक्टर आणि बीएमओच्या चौकशीचेही आदेश देण्यात आले आहेत.

# केजरीवालांच्या पीएला सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन

## स्वाती मालीवाल मारहाण प्रकरण



वृत्तसंस्था

**नवी दिल्ली :** दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा पीए बिभव कुमार याला सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. आम आदमी पक्षाच्या राज्यसभा खासदार स्वाती मालीवाल यांच्यावर कथित हल्ल्याप्रकरणी बिभव कुमारला अटक करण्यात आली होती. या प्रकरणानंतर मुख्यमंत्री केजरीवाल आणि आम आदमी पक्षाला भाजपने लक्ष्य केले.

जानेवारी महिन्यात बिभव कुमारला ताब्यात घेण्यात आले होते. स्वाती मालीवाल यांनी बिभव कुमार याच्यावर मारहाणीचा आरोप केला होता. सीएम हाऊसमध्ये आपल्याला मारहाण आणि शिवीगाळ करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला होता. नंतर स्वाती मालीवाल यांनी या प्रकरणाची तक्रार दिल्ली पोलिसांकडे केली आणि एफआयआर दाखल केला. याप्रकरणी दिल्ली पोलिसांनी बिभव कुमारला चौकशीसाठी ताब्यात घेतले होते. मुख्यमंत्री कार्यालयापासून दूर राहण्याचे आदेश

न्यायालयाने बिभव याला मुख्यमंत्री कार्यालयापासून दूर राहण्याचे आदेश दिले आहेत. महत्त्वाच्या आणि संवेदनशील साक्षीदारांची साक्ष पूर्ण होईपर्यंत बिभव कुमार याला मुख्यमंत्री कार्यालयात प्रवेश न करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याशिवाय, ते कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी खटल्याच्या सुनावणीबाबत कोणतेही भाष्य करणार नाहीत, अशी अट देखील घालण्यात आली आहे.


साक्षीदारांच्या सुरक्षेची खात्री करण्यासाठीच या अटी घातल्या आहेत आणि कोणत्याही दबावाशिवाय त्यांची साक्ष घेता येईल, असेही खंडपीठाने स्पष्ट केले.

# आसाम तृणमूल काँग्रेस प्रदेशाध्यक्षांचा राजीनामा

**गुवाहाटी :** आसाम तृणमूल काँग्रेसचे (टीएमसी) अध्यक्ष रिपुन बोरा यांनी रविवारी पक्षाचा राजीनामा दिला. रिपुन बोरा यांनी टीएमसीचे सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांना राजीनामापत्र पाठवून दिले आहे. या पत्रात त्यांनी पक्षाच्या सर्वेसर्वा आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना आसाममध्ये टीएमसी स्वीकार्य बनवण्यासाठी अनेक सूचना दिल्या होत्या; परंतु त्या सूचनांची अंमलबजावणी झाली नसल्याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. तसेच गेल्या दीड वर्षांपासून मी ममतादीदींना भेटू शकलो नाही, याचे शल्यही सातत्याने जाणवत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ईशान्येकडील राज्यातील लोक टीएमसीला पश्चिम बंगालचा 'प्रादेशिक पक्ष' मानतात आणि ते आपला पक्ष म्हणून स्वीकारण्यास तयार नाहीत, असा दावाही त्यांनी केला आहे.

# वैष्णोदेवी यात्रेच्या मार्गावर दरड कोसळली

## दोन भाविकांचा मृत्यू, अनेक यात्रेकरू अडकले



**कटरा :** वैष्णोदेवी यात्रेच्या मार्गावर एक मोठी दुर्घटना घडली आहे. पदयात्रा जिथून जाते त्या भागात दरड कोसळली आहे. या दुर्घटनेत दोन यात्रेकरूंचा मृत्यू झाला आहे. एक भाविक जखमी असून काही यात्रेकरू अडकले असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या घटनेनंतर प्रशासनाने मदत व बचावकार्य हाती घेतले आहे. जेणेकरून परिस्थिती नियंत्रणात आणता येईल. तसेच यात्रेकरूचा मार्ग मोकळा होईल. दरम्यान, जखमी झालेल्या यात्रेकरूवर प्राथमिक उपचार करून त्याला जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले आहे. त्याची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले आहे. दरम्यान, प्रशासनाने यात्रेकरूंना सतर्कतेचे आवाहन केले आहे. तसेच सर्वत्र लक्ष ठेवून मार्गक्रमण करण्यास सांगितले आहे. भूस्खलनानंतर यात्रेचा मार्ग बंद आहे.

# लखनौ विद्यापीठात १९ वर्षीय विद्यार्थिनीचा संशयास्पद मृत्यू

**लखनौ :** उत्तर प्रदेशात लखनौमधील राममनोहर लोहिया नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीच्या वसतिगृहात अनिका रस्तोगी या १९ वर्षीय विद्यार्थिनीचा मृतदेह सापडला आहे. वसतिगृहाच्या खोलीत संशयास्पद स्थितीत विद्यार्थिनी बेशुद्धावस्थेत आढळून आली. तिला रुग्णालयात हलवले असता मृत घोषित करण्यात आले. याप्रकरणी अधिक तपास सुरू करण्यात आला आहे. अनिका ही एलएलबीच्या तिसऱ्या वर्षाची विद्यार्थिनी असून ती आयपीएस संतोष रस्तोगी यांची मुलगी आहे.

# गोमांसाची तस्करी करणारे पोलिसांच्या जाळ्यात

## ३२ किलोहून अधिक गोमास जप्त

**लखनऊ :** उत्तर प्रदेशातील आंबेडकरनगर येथील दोन कट्टरपंथींना गोहत्या केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. दिलशाद बेग आणि अरबाज अशी गोहत्या केलेल्या कट्टरपंथी आरोपींची नावे असून आरोपींनीकडून तपासात पोलिसांनी ३२ किलो २०० ग्रॅम गोमांस, एका बंदूक, काडतुसे आणि लोखंड वस्तू, दुचाकी, मोबाईल जप्त केला. दिलशाद आणि बेग अशी आरोपींची नावे असून शनिवारी ३१ ऑगस्ट २०२४ रोजी घडलेल्या घटनेत सहभागी असलेला सलमान आणि मोहम्मद शाह याचा मुलगा गुडनू फरार आहे. छापा टाकण्यासाठी गेलेल्या पोलिसांवरही आरोपींनी गोळीबार केला होता. फरार आरोपीच्या शोध सुरूआहे. माहितीनुसार, ही घटना उत्तर प्रदेशातील आंबेडकर जिल्ह्यातील इब्राहिम पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आहे.



**चेन्नई :** तामिळनाडू सरकार राज्यातील १८ वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या नागरिकांसाठी कॅन्सर तपासणी अनिवार्य करणार असल्याची माहिती राज्याचे आरोग्यमंत्री सुब्रमण्यम यांनी दिली आहे. राज्यातील एरोडू, तिरुपत्तूर, रानीपेट आणि नगरसोल जिल्ह्यांमध्ये कॅन्सरच्या रुग्णांमध्ये वाढ झाल्याचे एका सर्वेक्षणात दिसून आले आहे.

# बांगलादेशात हिंदूंच्या नोकऱ्या अडचणीत

## ५० शिक्षकांना राजीनामा देण्यास भाग पाडले




वृत्तसंस्था

**ढाका :** बांगलादेशात शेख हसीना यांचे सरकार पडल्यानंतर हिंदूंना निशाणा बनवले जात आहे. आता तर सरकारी शाळांमध्ये शिकवणाऱ्या हिंदू शिक्षकांना बळजबरीने राजीनामा द्यायला भाग पाडले आहे. आतापर्यंत ५० शिक्षकांना राजीनामा द्यायला भाग पाडल्याचे समोर आले आहे.

स्थानिक वृत्तानुसार, २९ ऑगस्ट रोजी विद्यार्थी आणि बाहेरच्या काही लोकांनी बरिशाल येथील बेकरगंज सरकारी महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका शुक्ला राणी हलदर यांच्या कार्यालयात धाव घेऊन त्यांना राजीनामा द्यायला भाग पाडले. बरेच तास धमकावल्यानंतर हलदर यांनी साध्या कागदावर मी राजीनामा देत असल्याचे लिहून नोकरी सोडली. याआधी १८ ऑगस्टला अजीमपूर गव्हर्नमेंट गर्ल्स स्कूल आणि कॉलेजच्या ५० विद्यार्थिनींनी शाळेच्या मुख्याध्यापिका गितांजली बरुआ यांना घेरले. त्यांच्याकडून सहाय्यक मुख्याध्यापक गौतम चंद्र पॉल आणि शारिरिक शिक्षाच्या शहनाजा अख्तर यांच्या राजीनाम्याची मागणी केली. गितांजली बरुआ म्हणाल्या त्यांच्या कार्यालयावर हल्ला करत त्यांना अपमानास्पद वागणूक दिली.

# आंध्र, तेलंगणात धुवाधार; 24 तासांत 8 जणांचा मृत्यू



**चेन्नई :** आंध्र प्रदेश आणि तेलंगणामध्ये गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे. अनेक भागात पुरामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. आंध्रातील विजयवाडा येथे गेल्या २४ तासांत भूस्खलनात ५ जणांचा मृत्यू झाला आहे. तर गुंटूरमध्ये कालव्यात ३ जण बुडाले. तेलंगणातील केसमुद्रम ते महबूबाबाद दरम्यान रेल्वे ट्रॅक वाहून गेला. यासंबंधीचा व्हिडिओ व्हायरल झाला असून त्यामध्ये उद्ध्वस्त झालेला रेल्वेट्रॅक दिसत आहे.

रेल्वेमार्ग उखडल्यामुळे दिल्ली-विजयवाडा मार्गावरील सर्व गाड्या थांबवण्यात आल्या आहेत. आंध्र आणि तेलंगणातून जाणाऱ्या सुमारे ६ गाड्या रद्द करण्यात आल्या असून ९ अन्य मार्गांनी वळवण्यात आल्या आहेत. तेलंगणात आज सोमवारी मुसळधार पाऊस पडण्याची शक्मयता हवामान खात्याने वर्तवली होती. या इशाऱ्यामुळे सोमवारी सर्व शाळा बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात आला आहे. आंध्र प्रदेशातील विजयवाडा येथेही ५ दिवस जोरदार पाऊस कोसळण्याचा इशारा देण्यात आला आहे. मध्य प्रदेश-राजस्थानमध्ये सप्टेंबरच्या सुरुवातीपासूनच पुन्हा एकदा मुसळधार पावसाला सुरुवात झाली आहे. पूर आणि भूस्खलनाची शक्यताही हवामान खात्याने व्यक्त केली आहे. गुजरातमध्येही पावसाचा जोर कायम असून वडोदरा येथे मगरी निवासी भागात घुसण्याचे प्रकार वाढले आहेत.

# ६ ओलिसांची हत्या, इस्त्रायलमध्ये संतापाची लाट

देशोन्नती वृत्तसंकलन


**नवी दिल्लीः** दहशतवादी संघटना हमासने ओलिस ठेवलेल्या ६ ईस्त्रायली नागरिकांची डोक्यात गोळया झाडून हत्या केल्याचे रविवारी निदर्शनास आले. गाझामध्ये एका इस्रायली-अमेरिकन तरुणासह सहा ओलिसांचे मृतदेह बाहेर काढले. या घटनेची माहिती मिळताच इस्रायलमधील लाखो नागरिक युद्धविरामासाठी रस्त्यावर उतरले. ओलिसांची हत्या झाल्याने ईस्त्रायली नागरिकांमध्ये सत्तातपाची लाट उसळली आहे. इस्रायली लष्कराने गाझा पट्टीत सहा ओलिसांचे मृतदेह बाहेर काढल्यानंतर नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. हमाससोबत बंधक-युद्धविराम करार करावा, अशी जनतेची आग्रही मागणी आहे. 'टाईम्स ऑफ इस्रायल'च्या वृत्तानुसार, तेल अवीवमध्ये ३००,००० हून अधिक लोक जमले होते.

आंदोलकांनी अब-अबच्या घोषणा दिल्या. उर्वरित ओलिस नागरिकांना सुखरुप घरी आणण्यासाठी हमाससोबत युद्धविराम करण्याचे आवाहन त्यांनी पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांना केले. निदर्शकांनी इस्रायली झेंडे, पिवळया फिती आणि ओलिसांच्या सन्मानार्थ सहा खून झालेल्या ओलिसांची माफी मागणारे फलक हातात घेऊन रस्त्यावर उतरले होते.

### कामगार संघटनांचा संप

गाझामध्ये सहा ओलिसांच्या मृत्यूनंतर इस्रायलच्या सर्वात मोठ्या कामगार संघटनेने आज (दि. २ सप्टेंबर) देशभरात सर्वसाधारण संप पुकारला आहे. आरोग्य, वाहतूक आणि बँकिंग यासारख्या क्षेत्रातील ८००,००० कामगारांचे प्रतिनिधित्व करणारी ट्रेड युनियन हिस्ताद्रुत यांनी सांगितले की, सोमवारी सकाळी संप सुरू होईल. गाझामध्ये हमासने ओलिस ठेवलेल्या उर्वरित लोकांना परत आणता यावे यासाठी युद्धविरामासाठी सरकारवर दबाव वाढवणे हा या संपाचा उद्देश असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### लाखो नागरिक युद्धविरामासाठी रस्त्यावर



# शैक्षणिक नुकसानीची आम्हाला जाणिव!

## निर्णय मिसाळ अन् मुळे यांचे काम कौतुकास्पद

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी
राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांनी अचानकपणे राज्यव्यापी संप पुकारत कामकाज बंद केले आहे.बीडसह राज्य राज्यभरातील बसेस दिवसभर जागच्याजागीच थांबल्यामुळे प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत.बीड जिल्ह्यातील सर्वंच आगारातील कर्मचारी सहभागी झाले असल्याने जिल्ह्यातील ८१२ फे-या रद्द करण्यात आल्या आहेत.याचवेळी पाटोदा आगारातील वाहक मिसाळ जी.एम.आणि चालक सुभाष मुळे यांनी लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षण घेत असलेल्या शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी एसटी वाहतूक सुरुच ठेवली असुन त्यांच्यावर सर्वस्तरातुन कौतुकाचा वर्षाव होत आहे.



### शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून

काल पासुन सुरु असलेल्या राज्य व्यापी एसटी कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपात आम्ही जरी सहभागी असलो तरी लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक विद्यालयातील जवळपास २५० विद्यार्थ्यांना आम्ही नियमित सोय करत असल्याने त्यांचे शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी आम्ही मसेवाडी ,पिंपरनई , पोखरी , सोमनाथवाडी, महाजनवाडी गावातील विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून कालपासूनच कामावर आहोत.असे पाटोदा आगारातील वाहक मिसाळ जी.एम.आणि चालक सुभाष मुळे यांनी सांगितले.



### संवेदनशिलतेचे कौतुक: डॉ.गणेश ढवळे

एसटी कर्मचाऱ्यांचा संप सुरू असल्याने संपाच्या कालावधीत प्रवास वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी खाजगी प्रवासी बसेस,स्कुल बसेस, कंपनीच्या मालकीच्या बसेस व मालवाहु वाहतूक करण्यास गृहविभागाने परीवहन विभागाला दिली असली तरी खाजगी वाहतूक करणारांकडुन गोरगरीब प्रवाशांची आर्थिक लुट केली जात असताना ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी उचललेले पाऊल कौतुकास्पद आहे.

## केज तालुक्यात चोरट्यांचा धुमाकूळ

### जया राऊत:केज पोलिसांना दिले निवेदन



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी
केज तालुक्यात चोरट्यांचा दिवसेंदिवस धुमाकूळ सुरू असल्याच्या चर्चा होत आहेत.यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.याप्रकरणी पोलीस प्रशासनाने तात्काळ उपाययोजना करून चोराट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी शिवसेना महिला आघाडीच्या केज तालुकाप्रमुख जयाताई राऊत यांनी केली. केज पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक यांना शिवसेना महिला आघाडीच्या वतीने तालुकाप्रमुख जयाताई राऊत यांनी निवेदन दिले.निवेदनात म्हटले की,तालुक्यातील नागरिकांच्या मनात भीतीचे वातावरण पसरले आहे.कानडी व कानडी परिसरात चोरट्यांचा धुमाकूळ असल्याच्या बातम्या नागरिकांच्या कानावर येत आहे.शेत वस्तीवर राहणारे नागरिक रांत्रदिवस जागे राहत आहे.करिता पोलीस निरीक्षक यांनी तात्काळ उपाययोजना करावी.कानडी येथे पोलीस गस्त द्यावी.अशी मागणी शिवसेना महिला आघाडीच्या तालुकाप्रमुख जयाताई राऊत यांनी केली.यावेळी किसन दादा कदम नारायण राऊत प्रताप राऊत विठ्ठल रंगनाथ राऊत यश राऊत शांताताई काळे राधाताई हरणावळ उपस्थित होते.

## अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान

### अस्मानी कहर: शेतकरी झाला हवालदिल



मोठेवाडी/पुण्यभूमी प्रतिनिधी
माजलगाव तालुक्यात मागिल आठवड्यात झालेल्या जबरदस्त अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान होताना दिसत आहे, पिकांवर या अतिवृष्टीचा वाईट परिणाम होताना पहावयास मिळत आहे, कापूस मोठ्या प्रमाणावर ओंबळून जात आहे, हे नुकसान होताना पाहून शेतकरी हवालदिल होत आहेत. ताबडतोब करा कापूस पिकातील आकस्मिक मर व्यवस्थापन. बऱ्याच ठिकाणी झालेल्या पाऊसानंतर कपाशीच्या शेतामधील झाडे अचानक जागेवर सुकू लागलेली आहेत. याला आकस्मिक मर असे म्हणतात. कपाशीच्या आकस्मिक मर मध्ये दीर्घकाळ पाण्याचा ताण पडल्यानंतर जमिनीचे तापमान वाढलेले असते. अशावेळी सिंचन दिल्यास अथवा पाऊस पडल्यास झाडाला धक्का बसून अचानक झाड सुकते आणि कालांतराने झाडाची पाने गळतात. सिंचन दिल्यानंतर किंवा पाऊस पडल्यानंतर ३६-४८ तासांत आकस्मिक मर ची लक्षणे दिसू लागतात. सुकल्यानंतर पानगळ होऊन कालांतराने झाडे मरतात त्यामुळे उत्पादनात मोठे नुकसान होऊ शकते. आकस्मिक मर व्यवस्थापन १. अतिरिक्त पाण्याचा लवकरात लवकर निचरा करवा. २. वापसा येताच कोळपणी व खुरपणी करावी. ३. लवकरात लवकर २०० ग्रॅम युरिया+ १०० ग्रॅम पांढरा पोटॅश (००:००:५० खत ) + २५ ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड प्रति १० लिटर पाण्यात मिसळून तयार द्रावणाची प्रति झाड १०० मिली याप्रमाणे आळवणी करावी. किंवा १ किलो १३:००:४५ + २ ग्रॅम कोबाल्ट क्लोराईड + २५० ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड २०० लिटर पाण्यातून मिसळून तयार द्रावणाची प्रति झाड १०० मिली आळवणी करावी. ४. वरील प्रमाणे द्रावणाची आळवणी केल्यानंतर सुकू लागलेल्या झाडाजवळची माती पायाने लवकरात लवकर दाबून घ्यावी. वरील सर्व उपाययोजना शेतामध्ये झाडे सुकू लागलेली दिसताच लवकरात लवकर म्हणजे २४ ते ४८ तासाच्या आत कराव्यात जेणेकरून पुढील होणारे मोठे नुकसान वेळीच टाळता येईल. या सोबतच ट्रायकोडर्मा विरीडी या बुरशीची आळवणी करावी, १००सा /१० लिटर प्रमाणे अशी माहिती कृषी विभागा मार्फत तालुका कृषी अधिकारी जे.बी.भगत यांनी दिली.: माजलगाव तालुक्यात मागिल आठवड्यात झालेल्या जबरदस्त अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान होताना दिसत आहे, पिकांवर या अतिवृष्टीचा वाईट परिणाम होताना पहावयास मिळत आहे, कापूस मोठ्या प्रमाणावर ओंबळून जात आहे, हे नुकसान होताना पाहून शेतकरी हवालदिल होत आहेत. ताबडतोब करा कापूस पिकातील आकस्मिक मर व्यवस्थापन. बऱ्याच ठिकाणी झालेल्या पाऊसानंतर कपाशीच्या शेतामधील झाडे अचानक जागेवर पान २ वर...

## गौरी-गणपतीचे देखावे,सजावट स्पर्धा

### परंपरा : डॉ.अंजलीताई घाडगे स्तुत्य उपक्रम!

केज /पुण्यभूमी प्रतिनिधी
केज विधानसभा मतदार संघ, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाच्या नेत्या डॉ. अंजलीताई घाडगे यांनी केज शहरातील महिलांसाठी एक आगळी वेगळी स्पर्धा आयोजित केलेली आहे. येणाऱ्या गौरी गणपतीच्या सणा निमित्त महिलांनी घरोघरी केलेल्या सजावटीची आणि



देखाव्यांची केलेली आरास याची दखल घेत त्यांनी उत्कृष्ट आणि सामाजिक आशय व संदेश देणारे सामाजिक ऐक्याचा संदेश देणाऱ्या सजावटीसाठी त्यांनी स्पर्धा आयोजित केली आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड जिल्ह्याचे खा. बजरंग बप्पा सोनवणे यांच्या अर्धांगिनी आणि बीड जिल्हा परिषदेच्या सदस्या सौ. सारिकाताई बजरंग सोनवणे यांच्या हस्ते उत्कृष्ट देखावा आणि आरास व सजावट करणाऱ्या भगिनींना बक्षीस देऊन गौरव करण्यात येणार आहे. या स्पर्धेमध्ये शहरातील सर्व महिलांनी सहभागी होण्याचे आवाहन संयोजक म्हणून डॉ. अंजलीताई घाडगे यांनी केले आहे.

## मोहखेड स्मशानभूमीत अतिक्रमण

### आंदोलन : ग्रामस्थ बसले आमरण उपोषणास

मोहखेड/पुण्यभूमी प्रतिनिधी
येथील गट क्र २ मध्ये बौद्ध आणि मातंग समाज बांधवांच्या स्मशानभूमीवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण करण्यात आले आहे. यामुळे येथे अंत्यसंस्कार करण्यासाठी देखील जागा राहिली नसून मृतदेहांची अवहेलना होत असल्याने हे अतिक्रमण त्वरित काढून टाकावे, जयभीम नगर कडे जाणाऱ्या रस्त्याची दुरुस्ती करावी या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीतर्फे ग्रामपंचायत कार्यालयासमोर दि. २ सप्टेंबरपासून साखळी उपोषण करण्यात येत आहे.




गावातील बौद्ध आणि मातंग समाज स्मशानभूमीवर मागील काही काळापासून अतिक्रमण करून तेथे शेती करण्यात येत आहे. यामुळे दलित समाजास मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यासाठी देखील जागा राहिली नाही. यामुळे मृतदेहाची अनेकदा अवहेलना होत आहे. यामुळे या जागेवरील अतिक्रमण त्वरित काढून टाकावे. तसेच स्मशानभूमीची नोंद महसूल केंद्रात गट क्र. २ मध्ये आहे, ती नोंद ग्रामपंचायतमध्ये करण्यात यावी. या मागण्यांच्याबाबत वारंवार निवेदन देऊन सुद्धा कारवाई करण्यात येत नाही. तसेच गावातील जयभीम नगरला मुख्य रस्त्यास जोडणाऱ्या रोडची अत्यंत दुरवस्था झाली आहे. या रोडची देखील तत्काळ दुरुस्ती करावी, या मागणीसाठी साखळी उपोषणास दि. २ सप्टेंबरपासून सुरुवात करण्यात आली आहे. उपोषणात समस्त बौद्ध व मातंग समाज बांधव सहभागी झालेले आहेत.

## बुद्ध आणि धम्म ग्रंथ वाचनास प्रतिसाद

### कार्यक्रम: भारतीय बौद्ध महासभेचा उपक्रम

वडवणी/पुण्यभूमी प्रतिनिधी
वडवणी शहर आणि तालुक्यातील सर्व गावांमध्ये बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास गावोगावी उदंड प्रतिसाद मिळत आहे. अशी माहिती भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष प्रा. प्रकाश खळगे सर यांनी दिली.



तालुक्यातील सर्व गावांमध्ये संपूर्ण देशामध्ये भारतीय बौद्ध महासभा यांच्या वतीने वर्षावासाचे कार्यक्रम सुरू आहेत. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये तथागत भगवान गौतम बुद्धाने एकाच ठिकाणी बसून बौद्ध धर्माचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी भिक्खूंना मार्गदर्शन केले. हे भिखु तथागतांचे प्रवचन तीन महिन्याच्या काळामध्ये काळजीपूर्वक ऐकत होते. आपल्या हृदयामध्ये आणि बुद्धीमध्ये त्याची साठवणूक करीत होते. हे भिखू तीन महिन्याच्या नंतर चारही दिशेला तथागतांच्या आदेशाप्रमाणे धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी गावोगावी फिरत होते. त्यामुळे बौद्ध तत्त्वज्ञानाला आणि बौद्ध धम्माला प्रचंड प्रमाणामध्ये गती प्राप्त झाली होती. संपूर्ण भारत बौद्धमय तथागताने केलेला होता. सर्व जनता आनंदामध्ये आणि समाधानाने जीवन जगत होती. अशा या बौद्ध धम्माच तत्त्वज्ञान महामानव बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आत्मसात केले ..आणि १४ ऑक्टोबर १९५६ साली भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. बौद्ध धम्माची दीक्षा घेताना बाबासाहेब आंबेडकरांची पान २ वर...

## राष्ट्रपतींच्या हस्ते यथोचित सन्मान

### अभिनंदनिय:आ.सरोज अहिरेना पुरस्कार प्रदान



नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेच्या वतीने २०२३-२४ या दरम्यान विधिमंडळातील सर्वोत्कृष्ट भाषणासाठी देण्यात येणारा उत्कृष्ट भाषण पुरस्कार काल मुंबई येथे राजभवनात झालेल्या कार्यक्रमात राष्ट्रपती दौपदी मुर्म यांच्या हस्ते देवळाली मतदारसंघाच्या लोकप्रिय आमदार सरोजताई अहिरे यांनी स्वीकारला या प्रसंगी महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी.राधाकुष्णन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि विधिमंडळातील सदस्य उपस्थित होतेआमदार सरोजताई अहिरे यांनी आपल्या मतदारसंघातील अनेक प्रश्न मुद्देसूद आक्रमक व अभ्यासूपणे विधीमंडळात पान २ वर...

## दिलासा आ.संग्राम जगतापची यशस्वी भुमिका

# वेतन आयोगाच्या प्रस्तावाला मंजूरी

अप्पासाहेब मकासरे/नगर महापालिका कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याचा प्रस्तावावर नवव्या दिवशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वाक्षरी करून मंजुरी दिली आ संग्राम जगताप यांनी मुंबई येथे समक्ष भेट घेऊन मागील आठ दिवसांपासून सुरू असलेल्या उपोषणाची दखल घेण्यास भाग पाडुन प्रश्न मार्गी लावला

मागील वर्षीपासून महापालिका कर्मचारी ७ वा वेतन आयोग मिळावा म्हणून प्रयत्न करत होते शासना कडे अनेक निवेदने देऊन पाठपुरावा करत होते या आयोगासाठी लाँग मार्च चे देखील आयोजन केले होते तरी हा प्रश्न मार्गी लागला नव्हता

अखेर युनियनचे पदाधिकारी बाबासाहेब मुदगल जितेंद्र सारसर बाबासाहेब राशीनकर यांनी उपोषण सुरू केले ८ दिवसांपासून उपोषण सुरु होते तरी देखील शासनाने दखल घेतली नाही अखेर आ संग्राम जगताप यांनी मंगळवारी संध्याकाळी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन त्यांचे या प्रश्नांकडे लक्ष वेधून घेऊन प्रस्तावावर रात्री उशिरा स्वाक्षरी झाल्याची माहिती स्वतः उपोषण स्थळी येऊन दिली व आपल्या हस्ते उपोषण सोडवले.



### आ.जगताप यांचा युनियनकडून सन्मान

सातवा वेतन आयोगाचा प्रश्नी कर्मचारी वर्गाचा व युनियनचा बाजुंनी ठामपणे उभे राहुन यशस्वी भुमिका पार पडली म्हणून त्यांचा सत्कार जल अभियंता परिमल निकम युनियनचे सरचिटणीस आनंद वायकर कार्याध्यक्ष बलराज गायकवाड उपाध्यक्ष नेमाने क्षेत्रे ,सौदे ,सोळुंके ,कोतकर, साठे यांच्या सह युनियनच्या प्रतिनिधींनी केले


रेणुका माता कृषी विकास प्रतिष्ठाण देवगाव संचलित,
स्वामी विवेकानंद पॉलिटेक्निक, जोला ता. केज जि. बीड

**प्रथम व थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी संस्थास्तरीय प्रवेश फेरी**

रेणुका माता कृषी विकास प्रतिष्ठान देवगाव संचलित, स्वामी विवेकानंद पॉलिटेक्निक, जोला संस्थेतील प्रथम व थेट द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमाच्या कॅप फेरीनंतर रिक्त जागा समुपदेशनाने भरण्यासाठी संस्थास्तरीय प्रवेश फेरी खालील वेळा पत्रकाप्रमाणे आयोजित करण्यात आलेली आहे. प्रवेशासाठी इच्छुक पात्र विद्यार्थ्यांनी सर्व मूळ प्रमाणपत्र, दोन झेरॉक्स प्रती संच व फीससह प्रवेशासाठी संस्थेत प्रत्यक्ष उपस्थित रहावे.

| अ.क्र. | दिनांक | नोंदणी वेळ | प्रवेश फेरी | शाखा | स्थळ |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम फेरी | 05-09-2024 | 10:30 AM ते 01:00 PM | 01:00 PM ते 05:00PM | सर्व शाखेतील रिक्त जागा करिता | रेणुका माता कृषी विकास प्रतिष्ठान देवगाव संचलित, स्वामी विवेकानंद पॉलिटेक्निक, जोला ता. केज जिल्हा .बीड |
| द्वितीय फेरी | 06-09-2024 | 10:30 AM ते 01:00 PM | 01:00 PM ते 05:00PM | 05-09-2024 प्रवेश फेरीनंतर सर्व शाखांमधील रिक्त जागेसाठी | |
| तृतीय फेरी | 07-09-2024 | 10:30 AM ते 01:00 PM | 01:00 PM ते 05:00PM | 06-09-2024 प्रवेश फेरीनंतर सर्व शाखांमधील रिक्त जागेसाठी | |

अधिक माहितीसाठी प्रा. मोरे सुनील मो.९६६५४६४७३
प्रा. बेद्रे अजय मो. ८१४९८५७६४६

**प्राचार्य**
स्वामी विवेकानंद पॉलिटेक्निक, जोला